- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,५८,७०० /-
✔ २३ कॅरेट : १,५६,३५० /-
✔ चांदी : २,७८,३००/-

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : सोमवार, २४ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २५४ | किंमत : २ रूपये



Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075



सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


## मुंबईत गणपतीची मूर्ती कोसळली; २ ठार, ५ जखमी

**वृत्तसंस्था, मुंबई**

गणेशोत्सवाच्या आगमनाची जोरदार तयारी सुरू असतानाच दक्षिण मुंबईतील भुलेश्वर परिसरात शनिवारी रात्री एक दुर्दैवी घटना घडली. भुलेश्वरचा राजाची सुमारे २२ फूट उंच गणेशमूर्ती आगमन मिरवणुकीदरम्यानच अचानक कोसळल्यानं दोन जणांचा मृत्यू झाला, तर अन्य पाच जण जखमी झालेत, ज्यात दोन लहान मुलांचाही समावेश आहे. ही घटना बाळाराम मर्चंट रोडवरील कबुतरखाना, जय अंबे चौक परिसरात, मंडपापासून अवघ्या ५० फूट अंतरावर घडली असून, मुंबई पोलिसांनी याप्रकरणी अपघाती मृत्यूची नोंद केली.



मंडळाचं हे यंदाचं ६३ वे वर्ष असून, आगमन सोहळ्यात घडलेल्या या दुर्घटनेमुळे संपूर्ण मुंबईतील गणेशोत्सवाच्या उत्साहावर शोककळा पसरली आहे.

भायखळ्यातील अनिकेत देसाई यांच्या कार्यशाळेतून ही गणेश मूर्ती शनिवारी संध्याकाळी वाजतगाजत भुलेश्वरमधील आपल्या मंडपाकडे निघाली होती. मात्र, त्यापूर्वीच मूर्तीच्या विसर्जनाची वेळ ओढवली. मंडपापासून काही अंतरावर असतानाच ज्या क्रेनवर या उंच मूर्तीचा भार तोलून धरला होता, ती क्रेन कमजोर निघाली आणि क्रेनमधून निसटलेली ही महाकाय मूर्ती कुणाला काही कळण्याच्या आत कोसळली. या दुर्घटनेत मंडळाचे अध्यक्ष संकेत नेवशे आणि पदाधिकारी बृजेश जोशी यांचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य पाच जण जखमी आहेत.

या रुग्णालयांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संकेत नेवशे (वय ३३) यांना एच. एन. रिलायन्स रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित करण्यात आलं, तर जी. टी. रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या बृजेश हेमंत जोशी (वय ३०) यांनाही मृत घोषित करण्यात आलं आहे

## मनोज जरांगेंची लढाई आमच्याविरुद्ध नाही

### छगन भुजबळ यांचे वक्तव्य

**वृत्तसंस्था, नाशिक**

एकीकडे मनोज जरांगे पाटील यांच्याकडून २९ ऑगस्टच्या आंदोलनाची तयारी सुरू आहे. दुसरीकडे ओबीसी नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी आज समता परिषदेची बैठक घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या. गेल्या अनेक दिवसांपासून समता परिषदेची बैठक झाली नव्हती, आज राज्यातील वरिष्ठ पदाधिकारी यांच्यासोबत संवाद केला. समता परिषदेच्या सर्व कार्यक्रमांची उजळणी केल्याचे सांगत छगन भुजबळ यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केले. यावेळी, मनोज जरांगे पाटील यांच्या २९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या आंदोलनावरही त्यांनी भूमिका मांडली, तर लक्ष्मण हाकेंकडून ओबीसींचे आरक्षण संपल्याबाबत सातत्याने होत असलेलं वक्तव्य अमान्य असल्याचे बोलून दाखवले.



कोण म्हणते ओबीसीचे आरक्षण संपले? जात पडताळणीमध्ये चुका असेल तर त्यावर आम्ही लढतोय. २०११ पासून जात जनगणना करावी ही आमची मागणी होती, त्यावर सरकारने निर्णय घेतला आहे. सरकार आमच्यासोबत आहे, त्यावर आम्ही आता काय बोलणार, असा सवाल छगन भुजबळ यांनी विचारला. तसेच, महात्मा फुले यांचे वांगमय भाषण यावर आम्ही मागणी केली, त्यावर सरकार काम करत आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

मनोज जरांगे यांची लढाई आमच्या विरोधात नाही, त्यावर आम्ही काय बोलणार, सरकार त्यावर बोलतील आणि निर्णय घेतील, असे भुजबळ यांनी म्हटले. आम्ही जात जनगणना मागणी केली, त्यावर सरकार काम करत आहे.

### थोडक्यात

## २ चिमुकल्यांचा जीव घेत आईची आत्महत्या

**कोल्हापूर** : कोल्हापूर जिल्ह्यातील जयसिंगपूर येथून एक अत्यंत सुन्न करणारी बातमी समोर आली आहे. एका आईने आपल्या दोन चिमुकल्या मुलांना गळफास लावून स्वतःही आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. या दुर्दैवी घटनेत आईसह दोन निष्पाप बालकांचा दुदैर्वी मृत्यू झाला आहे. या प्रकारामुळे संपूर्ण जयसिंगपूर परिसरावर शोककळा पसरली आहे. ही धक्कादायक घटना जयसिंगपूर शहरातील मच्छी मार्केट परिसरात घडली. संगीता राजू गाडीवडर (वय २५), मुलगी प्रगती राजू गाडीवडर (वय ४) आणि मुलगा प्रतीक राजू गाडीवडर (वय दीड वर्ष) अशी मृतांची नावे आहेत. शनिवारी रात्री हा प्रकार उघडकीस आला. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. एकाच घरातील तिघांचे मृतदेह पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. आईने हे टोकाचे पाऊल नेमक्या कोणत्या कारणांमुळे उचलले, हे अद्याप अस्पष्ट असून पोलिस या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास करत आहेत. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यातून तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे. संगीता यांचे काका दत्ता हे सायंकाळी कामावरून घरी परतले. त्यावेळी घराचा दरवाजा आतून बंद होता. बराच वेळ हाक मारूनही आतून काहीच प्रतिसाद न मिळाल्याने, त्यांनी शेजाऱ्यांच्या मदतीने दरवाजा तोडून घरात प्रवेश केला. त्यावेळी प्रगती आणि प्रतीक हे ओढणीच्या साहाय्याने, तर संगीता यांनी साडीच्या साहाय्याने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले.

## बोअरवेलमधून गरम पाणी, वाशिममध्ये आश्चर्यकारक घटना



**वृत्तसंस्था, वाशिम**

जिल्ह्यातील राजुरा गावात सध्या एका आश्चर्यकारक घटनेने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले आहे. गावात असलेल्या तब्बल १२ वर्षे जुन्या बोअरवेलमधून गेल्या २० ते २५ दिवसांपासून सातत्याने गरम पाणी बाहेर येत आहे.

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, ही बोअरवेल साधारण १२ वर्षे जुनी असून, आजवर यातून अत्यंत सामान्य आणि पिण्यायोग्य पाणी येत होते. मात्र, गेल्या तीन ते चार आठवड्यांपासून या बोअरवेलच्या पाण्याच्या तापमानात अचानक मोठी वाढ झाली असून, त्यातून चक्क गरम पाणी उपसले जात आहे. हा प्रकार परिसरातील नागरिकांसाठी एखाद्या आश्चर्यपेक्षा कमी नाही. दररोज आजूबाजूचे लोक हे गरम पाणी पाहण्यासाठी मोठी गर्दी करत आहेत.

**पाणी पिण्यास अयोग्य**

या घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासनाने आणि संबंधित विभागाने तत्काळ या गावाला भेट देऊन बोअरवेलच्या पाण्याची प्राथमिक तपासणी केली. या प्राथमिक तपासणीत एक धक्कादायक बाब समोर आली आहे. या गरम पाण्यात विविध रसायनांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले असून, हे पाणी मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक आणि पिण्यास पूर्णपणे अयोग्य असल्याचे स्पष्ट झाले आहे.

बोअरवेलमधून अचानक गरम पाणी का येत आहे? भूगर्भात एखादी उष्णतेची लाट किंवा रासायनिक प्रक्रिया घडत आहे का? याचा सखोल आणि शास्त्रीय अभ्यास करणे गरजेचे बनले आहे. त्यामुळे या बोअरवेलच्या पाण्याचे नमुने गोळा करून ते सविस्तर आणि उच्चस्तरीय तपासणीसाठी नागपूर येथील प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत.

## झोपड्यांवर कोसळला कचऱ्याचा डोंगर, २२ जणांचा जागीच मृत्यू

**वृत्तसंस्था, गिनी**

गिनीची राजधानी कोनाक्रीमध्ये मोठी दुर्घटना घटना घडली आहे. झोपड्यांवर कचऱ्याचा डोंगर कोसळल्यानं दुर्घटना घडली आहे. यामध्ये २२ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. दार एस सलाम इथं ही घटना घडली आहे. या दुर्घटनेत अनेकजण जखमी झाल्याची माहिती देखील मिळत आहे. बचावकार्य सुरु करण्यात आलं आहे.

गिनीच्या नागरी संरक्षण सेवेच्या प्राथमिक आकडेवारीनुसार या दुर्घटनेत आतापर्यंत किमान २२ जणांचा मृत्यू झाला आहे. रविवारी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास कोनाक्रीमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे हे भूस्खलन झाले आहे. ज्यामुळे कचराभूमी ओसंडून वाहू लागली आणि कचराभूमीच्या आजूबाजूच्या झोपड्या गाडल्या गेल्या. घटनास्थळी बचाव कार्य सुरु करण्यात आलं आहे. मिळालेल्या



माहितीनुसार, कचराभूमीजवळ राहणाऱ्या स्थानिक रहिवाशांना परिसर रिकामा करण्याच्या नोटिसा आधीच बजावण्यात आल्या होत्या. त्यानंतर अनेकांनी आपली घरे सोडून इतरत्र पलायन केले होते. मात्र, काही लोक अद्यापही तिथे राहत होते.

**पावसाचे पाणी कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर गेल्याने भूस्खलन**

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार या दुर्घटनेत अनेकजण जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. सहा जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती देखील मिळत आहे. जखमींवर उपचार सुरु करण्यात आले आहे. पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास मुसळधार पाऊस सुरू झाला आणि पावसाचे पाणी कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर गेल्याने भूस्खलन झाले. या भूस्खलनामुळे जवळच्या झोपड्या ढिगारा आणि चिखलाखाली गाडल्या गेल्या.

**अनेकांनी सुरक्षीतस्थळी स्थलांतर केले होते**

दरम्यान, मुसळधार पावसामुळं ही दुर्घटना घडल्याचे सांगितले जात आहे. कचऱ्यांच्या ढिगाऱ्याखाली मोठ्या प्रमाणात पाणी गेले होते. यानंतर कचऱ्याचा डोंगर खाली कोसळल्याची माहिती देण्यात आली आहे. दरम्यान, कचराभूमीजवळ राहणाऱ्या स्थानिक लोकांना प्रशासनाने सूचना दिल्या होत्या. तसेच हा परिसर रिकामा करण्याच्या नोटिसा आधीच बजावण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. दरम्यान, यानंतर काही नागरिकांनी आपल्या झोपडपट्या खाली देखील केल्या होत्या.

अनेकांनी सुरक्षीतस्थळी स्थलांतर केले होते. त्यांनी धोक्याची ठिकाणी असलेली आपली घरे सोडून दुसऱ्या ठिकाणी गेले होते. मात्र, काही जणांना झोपडपट्या रिकाम्या केल्या नाहीत. धोका आहे हे माहित असूनही अनेकजण तिथेच राहत होते. अशातच आज दुर्दैवी घटना घडली आहे. कचऱ्याचा डोंगर कोसळल्यामुळं २२ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. भीषण अपघात झाला त्यावेळी घटनास्थळी अजूनही मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते.

## चांदगुडे कुटुंबात मृत्यूनंतरही दुरावा; वडिलांवर गावी, तर आई-मुलावर शहरात अंत्यसंस्कार

**वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर**

खवड्या डोंगरावर चांदगुडे कुटुंबातील तिघांचा दुदैर्वी मृत्यू झाल्यानंतरही कुटुंबातील दुरावा कायम राहिल्याचे चित्र पुढे आले. आई संगीता व मुलगा कुणाल यांच्यावर शहरातील मुकुंदवाडी स्मशानभूमीत, तर वडील मुरलीधर यांच्यावर त्यांच्या मूळ गावी धनगर पिंपळगाव येथे अन्त्यसंस्कार झाले. या घटनेमागे केवळ मोबाईलच्या थकलेल्या हप्त्याचा वाद होता की, त्यामागे संपत्ती, शेती व नातेसंबंधांतील कौटुंबिक वादांची मोठी पार्श्वभूमी होती, याचा पोलिसांकडून तपास सुरू आहे.

सततच्या कौटुंबिक वादातून कुणाल चांदगुडे (१९) आत्महत्येच्या उद्देशाने खवड्या डोंगराच्या कड्यावर जाऊन उभा राहिला होता. त्याला वाचविण्यासाठी धावलेले वडील मुरलीधर (४८) कुणालसह खोल दरीत कोसळले. डोळ्यांदेखत पती आणि मुलगा दरीत पडल्याचा धक्का सहन न झाल्याने आई संगीता (४२) यांनीही त्याच दरीत उडी घेतली. यात तिघांचाही मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी दुपारी घडली.

डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणारा कुणाल नीट-यूजीपरीक्षेची तयारी करीत होता. त्याचे वडील मुरलीधर ट्रान्स्पोर्ट कंपनीत चालक होते. काही दिवसांपासून कुणाल व वडिलांमध्ये मतभेद सुरू होते. शुक्रवारी सकाळी



क्लाससाठी घराबाहेर पडलेल्या कुणालने खवड्या डोंगर गाठला. ही माहिती मिळताच त्याचे आई-वडील व नातेवाईक तिथे पोहोचले. दीड तास मनधरणी सुरू होती. कुणालला पकडण्यासाठी मुरलीधर धावल्यानंतर दोघेही दरीत कोसळले. त्यानंतर संगीता यांनीही दरीत उडी घेतली.

पोलिसांच्या माहितीनुसार, शुक्रवारी रात्री उशिरा मुरलीधर यांचा मृतदेह त्यांचे चुलत भाऊ अण्णासाहेब चांदगुडे, बहीण शोभा म्हस्के यांच्या ताब्यात दिला. त्यांनी मुरलीधर यांच्यावर मूळ गाव धनगर पिंपळगाव (ता. अंबड) येथे अंत्यसंस्कार केले. संगीता व कुणाल यांचे मृतदेह संगीता यांचे वडील बबनराव गाभुड यांच्याकडे दिले. माहेरच्या नातेवाईकांनी दोघांवर मुकुंदवाडी स्मशानभूमीत अन्त्यसंस्कार करण्याचा निर्णय घेतला.

चांदगुडे कुटुंबातील तिघांच्या मृत्यूनंतर कुणालचा लाडका पाळीव श्वान शेरू एकटा पडला आहे. शुक्रवारी रात्रभर खिडकीतून त्याच्या भुंकण्याचा आवाज ऐकू येत होता. गेल्या सहा वर्षांपासून कुणालच शेरूचा सांभाळ करीत होता. शनिवारी शेरूला बिस्किटे भरविताना नातवाच्या आठवणीने आजोबा बबनराव गाभुड यांचे डोळे पाणावले.

कुणालने डॉक्टर व्हावे, अशी त्याची आणि आई-वडिलांची इच्छा होती. तो शांत आणि हुशार मुलगा होता. त्याच्या मनात आत्महत्येचा विचार नसावा, असे बबनराव यांनी सांगितले. कुणालच्या आठवणींसोबत शेरूचाही सांभाळ करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे.

**सोशल मीडिया पोस्ट; कौटुंबिक वादाचे संकेत**

चांदगुडे कुटुंब चार महिन्यांपूर्वी देवळाई परिसरातून झाल्टा फाटा परिसरात राहण्यासाठी आले होते. २ महिन्यांपासून कुटुंबात कुरबुर सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. संगीता यांनी ऑगस्टमध्ये सोशल मीडियावर संपत्ती, शेती, मुलगा आणि काही नातेवाईकांना उद्देशून रीलच्या स्वरूपातील व्हीडीओ पोस्ट केले. यातून नातेसंबंधांतील तणाव, कौटुंबिक वादांचे संकेत मिळत असल्याने पोलिसांकडून त्यांचीही तपासणी होत आहे. मोठ्या मुलाच्या मृत्यूनंतर संगीता यांचा कुणालवर अधिक जीव होता.

## जपानमध्ये तासाभरात दोन वेळा भूकंप, ३० जण जखमी

**वृत्तसंस्था, टोक्यो**

जपानच्या होक्काइडो प्रांतात रविवारी रात्री पुन्हा एकदा मोठा भूकंप झाला. जपानमध्ये तासाभरातच दुसऱ्यांदा भूकंप झाला आहे. जपानच्या हवामानशास्त्र एजन्सीनं दिलेल्या माहितीनुसार होक्काइडोमध्ये झालेल्या दुसऱ्या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ६.० नोंदवण्यात आली. स्थानिक प्रमाण वेळेनुसार दुसरा भूकंप १०.४५ वाजता झाला.

दुसऱ्या भूकंपाचं केंद्र होक्काइडोमधील उराकावा किनाऱ्यापासून समुद्राच्या तळ्याशी ४० किलोमीटर अंतरावर नोंदवण्यात आलं. दुसऱ्या भूकंपानंतर सुनामीचा कोणताही अलर्ट जारी करण्यात आलेला नाही. याच कारण भूकंपाची तीव्रता ७ च्या स्केलवर ४ नोंदवण्यात आली आहे.

जपानच्या होक्काइडोमध्ये झालेल्या भूकंपापूर्वी पूर्व भागात तासाभरापूर्वी ५.९ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप आला होता. यामुळं राजधानी टोक्योमध्ये काही काळासाठी अफरातफरी सारखी स्थिती निर्माण झाली होती. भूकंपाच्या धक्क्यांमुळं टोक्योमध्ये ३० हून अधिक लोक जखमी झाले होते. असोसिएटेड प्रेसच्या अधिकाऱ्यांच्या हवाल्यानं दिलेल्या रिपोर्टनुसार टोक्योमध्ये जेव्हा भूकंपाचा पहिला धक्का बसला तेव्हा जे लोक झोपलेले होते ते जखमी झाले.

संपादकीय लेखणीतून...

# वारकरी संप्रदाय आणि भागवत एकादशी

हिंदू पंचांगानुसार प्रत्येक महिन्यातील दोन्ही पक्ष- शुक्ल व कृष्ण पक्षांमधील अकराव्या तिथीला एकादशी म्हणतात. जेव्हा एकादशीची तिथी दोन दिवस येते, तेव्हा पहिल्या दिवसाच्या एकादशीला "स्मार्त एकादशी" आणि दुसऱ्या दिवसाच्या एकादशीला "भागवत एकादशी" वा "वैष्णव एकादशी" म्हटले जाते. वारकरी संप्रदायात भागवत एकादशीचे व्रत अत्यंत भक्तीभावाने पाळले जाते.

भगवान विष्णूंना प्रसन्न करण्यासाठी भागवत एकादशी व्रत केले जाते. वारकरी संप्रादयामध्ये एकादशीचे व्रत अगदी भक्तीभावाने ठेवले जाते. या दिवशी भगवान विष्णुंची पूजा केली जाते. प्रत्येक चांद्रमासातील शुक्ल व कृष्ण पक्षातील ११व्या तिथीला एकादशी म्हटले जाते. या दिवशी विष्णु भक्त तसेच विठ्ठल भक्त उपवास करतात. एकादशीच्या दुसऱ्या दिवशी उपवास सोडला जातो. भागवत एकादशी हे हिंदू धमार्तील अत्यंत महत्त्वपूर्ण व्रत आहे. प्रत्येक एकादशीला व्रत ठेवणे हे मनुष्याच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी आवश्यक मानले जाते, पण त्यातील भागवत एकादशी विशेष महत्त्वाची आहे. या एकादशीला श्रीविष्णूच्या भगवद्गीतेचे वाचन, व्रत, उपवास आणि विविध धार्मिक कृत्ये केली जातात. याचे धार्मिक, आध्यात्मिक आणि पारंपरिक महत्त्व अनन्यसाधारण आहे. भागवत एकादशीचे व्रत हे त्याग, तपस्या आणि भक्तिरूपी पवित्रता साधण्यासाठी महत्त्वाचे ठरते. भागवत एकादशीला श्रीविष्णूच्या आशीवार्दाने पापांचे नाश होते, आणि भक्ताच्या जीवनात सुख, समृद्धी आणि शांती येते. या दिवशी भक्त श्रीविष्णूची पूजा करून, त्याच्या व्रताने सामर्थ्य मिळवण्यासाठी प्रार्थना करतात.

द्वादशीच्या म्हणजे एकादशीनंतर एकदाच उपवास करणारा साधक आपले पापक्षालन करतो आणि आपल्या आत्म्याची शुद्धता साधतो. भागवत एकादशीच्या दिनी विशिष्ट व्रत आणि पूजा पाठ करणे, हे भक्तांचे पुण्य वाढवते आणि प्रत्येक व्रताद्वारे उपास्यदेवतेशी जुळवून घेतले जाते. यामुळे भक्तांच्या जीवनात आंतरिक शांती आणि आत्मविश्वास निर्माण होतो. आध्यात्मिक महत्त्वः एकादशीचे व्रत भक्तांना आत्मसाक्षात्काराच्या दिशेने मार्गदर्शन करते. व्रत ठेवताना आणि श्रीविष्णूची प्रार्थना करतांना भक्त आंतरिक शांती आणि परिपूर्णता अनुभवतात. हे व्रत त्यांच्या मनाच्या शुद्धतेसाठी महत्त्वपूर्ण आहे, कारण ते त्यांना अनावश्यक चंचलतेपासून मुक्त करते आणि ध्यान करण्यासाठी योग्य वातावरण तयार करते. भागवत एकादशीचे व्रत ठेवणे म्हणजे एका दिवसासाठी दुनियेच्या सर्व विषयांचा त्याग करणे आणि फक्त भगवान श्रीविष्णूच्या ध्यानात रममाण राहणे, होय. पारंपरिक महत्त्वः भारतामध्ये प्रत्येक एकादशीला विशेष धार्मिक महत्त्व आहे, पण भागवत एकादशीला विशेष पारंपरिक उत्सव म्हणून मानले जाते. कुटुंबाच्या प्रत्येक सदस्याने या दिवशी व्रत ठेवणे आणि श्रीविष्णूची पूजा करणे हे एक पारंपरिक कर्तव्य मानले जाते. या दिवशी अनेक भक्त मंदिरांमध्ये जाऊन श्रीविष्णूची पूजा करतात, व्रत घेतात आणि विशेष प्रसाद ग्रहण करतात. या दिवशी विशेषतः भगवान श्रीविष्णूला अर्पण केलेले नैवेद्य, हळदीकुंकू, पुष्पहार आणि भव्य पूजा व सामूहिक व्रत पूजा या सर्वांची विशेष महत्ता आहे.

जसे आपण भागवत एकादशीचे धार्मिक व अध्यात्मिक महत्त्व समजून घेतले तसेच या दिवसाचे सामाजिक महत्त्व जाणून घेणे व ते अंमलात आणणे, हे आपले कर्तव्य आहे. जसे आपण भगवान विष्णूंची पूजा अर्चा करून आपल्यासाठी पाप नाशनाची प्रार्थना करतो, तसे सामाजिक कार्याला या दिवशी उचित हातभार लावून आपण बरेच पुण्य कमवू शकतो. भगवान विष्णूंच्या नावावर आधारित हि संस्था म्हणजेच नारायण सेवा संस्था हि तुम्हाला या कार्यात योग्य ती मदत करू शकते. नारायण सेवा संस्थान ही एक समाजसेवी संस्था आहे जी समाजातील वंचित घटक व अपंगांसाठी काम करते. या संस्थेने आपल्या सामाजिक कार्याने, शारीरिक व मानसिक त्रास असलेल्या व्यक्तींच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी विविध सेवा सुरू केल्या आहेत. याच कायार्साठी अश्या पवित्र दिवशी केलेलं दान हे उचित फल प्राप्तीसाठी योग्य ठरू शकतं. तर मग अश्या दिवशी तुम्ही जर या संस्थेद्वारे दान केलं तर तुमचा पवित्र व्रतविधी अजून समृद्ध होईल आणि तुमच्या जीवनात श्रीविष्णूच्या आशीवार्दाने शांती व आनंद यायला मदत होईल. भागवत एकादशीचे व्रत धार्मिक, आध्यात्मिक आणि पारंपरिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे. हे व्रत भक्तांना त्यांच्या जीवनातील पापांची शुद्धता साधण्यास, आत्मसाक्षात्कार साधण्यास, आणि शांतीचा अनुभव घेण्यास मदत करते. याप्रमाणे, नारायण सेवा संस्थान आपल्याला आपल्या दानाच्या माध्यमातून समाजातील गरजू लोकांसाठी मदत करण्याची संधी देते.

हिंदू धर्मातील एकादशी व्रतांना अत्यंत पवित्र मानले जाते आणि त्यामध्येही भागवत एकादशी विशेष महत्त्वाची आहे. आषाढ शुक्ल एकादशीला साजरी होणारी ही एकादशी भगवान श्रीविष्णू व त्यांच्या अवतार श्रीकृष्णाच्या भक्तीला समर्पित असते. याला 'पद्मा एकादशी' किंवा 'आषाढी एकादशी' असेही म्हणतात. हा दिवस उपवास, पूजन, भजन-कीर्तन, श्रीमद्भागवत पाठ आणि दानधमार्ने भरलेला असतो. वारकरी संप्रदायासाठी तर भागवत एकादशी हा अत्यंत भक्तीचा तसेच आनंदाचा दिवस असतो. पंढरपूरच्या विठोबा रुख्मिणी मंदिरात लाखो भाविकांची वारी होते. या दिवशी केलेला उपवास आणि भक्ति आराधना, जीवनातील पापांचे क्षालन करून मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखवतो, असे मानले जाते. यात भागवत एकादशीचे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व, व्रत करण्याची पद्धत, विशेष परंपरा, तसेच विविध तीर्थक्षेत्रांतील साजरा होणारा उत्सव. जर तुम्हाला अध्यात्मात रस असेल तर हा दिवस भक्तीमयतेने अनुभवण्यास विसरू नका! वारकरी संप्रादयामध्ये परंपरेने भागवत एकादशी साजरी केली जाते. या एकादशीच्या दिवशी भगवान विष्णुंची पूजा करून विष्णू भक्त दिवसभर उपवास करतात. भागवत एकादशी व्रत हे पूर्ण नियम, श्रद्धा व विश्वासाने केले जाते. या व्रताच्या प्रभावामुळे मोक्ष प्राप्ती होते. या व्रतामुळे अश्वमेध यज्ञ, घोर तपस्या, तीर्थ स्नान व दान या सर्वांपासून मिळणाऱ्या पुण्यापेक्षाही जास्त पुण्य मिळते, असे पौराणिक कथेत म्हटले आहे. वारकरी संप्रादयामध्ये एकादशीच्या व्रताला विशेष महत्त्व आहे. प्रत्येक मासात २ याप्रमाणे वर्षामध्ये २४ एकादशी येतात. यातील चैत्रापासून फाल्गुन मासातील शुक्ल पक्षात- कामदा, मोहिनी, निर्जला, शयनी, पुत्रदा, परिवर्तिनी, पाशांकुशा, प्रबोधिनी, मोक्षदा, प्रजावर्धिनी, जयदा व आमलकी यांचा समावेश होतो.

# कुपोषणाशी लढा की व्यवस्थेशी ?: अंगणवाडी सेविकांचा संघर्ष

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

भारतात कुपोषणाची समस्या मुळापासून संपवण्यासाठी आणि बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी एकात्मिक बाल विकास सेवा आणि शालेय पोषण आहारासारख्या महत्त्वाकांक्षी योजना सुरू करण्यात आल्या. कागदावर या योजनांची उद्दिष्टे अत्यंत उदात्त आणि लोककल्याणकारी दिसतात; मात्र जमिनीवरील वास्तव अत्यंत विदारक आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागातील अंगणवाड्यांमध्ये पोषण आहाराच्या नावाखाली दिला जाणारा निकृष्ट दर्जाचा कच्चा माल, त्याविरोधात आवाज उठवणाऱ्या प्रामाणिक कर्मचाऱ्यांची होणारी प्रशासकीय गळचेपी आणि व्यवस्थेत खोलवर रुजलेली कंत्राटदार-अधिकारी साखळी यामुळे आज संपूर्ण पोषण व्यवस्थाच संकटात सापडली आहे. नुकतेच समोर आलेले अंगणवाडी सेविका देवयानी पारधी यांचे प्रकरण या संपूर्ण भ्रष्ट व दडपशाही व्यवस्थेचा पर्दाफाश करणारे ठरले आहे.

देवयानी पारधी प्रकरणमध्ये सत्याचा आवाज दाबण्याचा प्रशासकीय प्रयत्न करण्यात येत आहे. अंगणवाडी सेविका हा ग्रामीण आरोग्य आणि बालविकासाचा पाया मानल्या जातात. अत्यंत तोकड्या मानधनावर काम करणाऱ्या या महिला स्वतःच्या गावातील बालकांच्या पोषणाची जबाबदारी प्रामाणिकपणे सांभाळत असतात. जेव्हा देवयानी पारधी यांनी अंगणवाडीत वाटप केल्या जाणाऱ्या पोषण आहारातील निकृष्ट दर्जा, धान्यातील त्रुटी आणि गैरप्रकारांवर उघडपणे बोट ठेवले, तेव्हा प्रशासनाकडून सुधारणा होण्याची अपेक्षा होती. मात्र, व्यवस्थेने नेहमीप्रमाणे स्वतःच्या चुका झाकण्यासाठी तक्रारदारालाच लक्ष्य केले. कोणतीही सखोल व निष्पक्ष चौकशी न करता पारधी यांच्यावर शिस्तभंगाचा ठपका ठेवून त्यांना थेट सेवेतून बडतर्फ करण्यात आले. व्यवस्थेतील विसंगती उघडी पाडणाऱ्या एका सामान्य सेविकेवर झालेली ही कारवाई केवळ एका व्यक्तीवरचा अन्याय नव्हती, तर प्रशासनातील चुकीच्या गोष्टींविरोधात बोलणाऱ्या प्रत्येकाचे तोंड बंद करण्याचा एक धाकदपटशा होता.

## माध्यमांचे समाजभान आणि लोकशक्तीचा विजय

या अन्यायाविरुद्ध सोशल मीडियाने प्रत्यक्ष घटनास्थळावरून निर्भय वार्तांकन केले आणि वस्तुस्थिती समोर आणली, तेव्हा या प्रकरणाला जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले. समाजमाध्यमांवर ही मोहीम राज्यभर पसरली आणि सर्वसामान्य नागरिक, पालक, सामाजिक कार्यकर्ते तसेच कर्मचारी संघटना एकवटल्या. माध्यमांचा वाढता दबाव आणि सर्व स्तरांतून उमटलेला संताप लक्षात घेऊन जिल्हा परिषद प्रशासनाला अखेर नरमाईची भूमिका घ्यावी लागली. जिल्हा परिषद अध्यक्षांनी प्रकरणाची पुनर्पडताळणी करून देवयानी पारधी यांच्यावरील बडतर्फीचे आदेश पूर्णपणे मागे घेतले आणि त्यांना सन्मानाने पूर्ववत सेवेत रुजू करून घेतले. हा निर्णय एका सेविकेचा व्यक्तिगत विजय तर आहेच, शिवाय तो प्रशासकीय मनमानीविरोधात जागृत पत्रकारिता आणि जनशक्तीच्या विजयाचे प्रतीकही ठरला.

देवयानी पारधी यांची पुनर्स्थापना झाली असली, तरी त्यांनी ज्या गंभीर प्रश्नावर बोट ठेवले होते, तो मूळ प्रश्न आजही कायम आहे. शासनाच्या वतीने दिला जाणारा पोषण आहार खरोखरच बालकांच्या पोषणासाठी उपयुक्त आहे का? अनेक केंद्रांवर बुरशी लागलेले पीठ, अळ्या पडलेले धान्य, खडेयुक्त डाळी आणि चवहीन अन्न पुरवले जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येतात. ज्या वयात बालकांच्या मेंदूची आणि शरीराची वाढ होत असते, त्याच वयात त्यांना अशा प्रकारचा निकृष्ट आहार देणे हा त्यांच्या आरोग्याशी चाललेला उघड खेळ आहे. निकृष्ट अन्नामुळे बालकांना पोटाचे विकार, संसर्ग आणि दीर्घकालीन कुपोषणाचा सामना करावा लागतो. गरिबीमुळे शासकीय अंगणवाड्यांवर अवलंबून असणाऱ्या गरीब पालकांच्या मुलांच्या वाट्याला हे निकृष्ट अन्न का यावे, हा एक अत्यंत गंभीर सामाजिक आणि मानवी हक्कांचा प्रश्न आहे.

या गैरव्यवस्थेला नक्की जबाबदार कोण, याचा शोध घेतल्यास पोषण आहार वाटपातील केंद्रीकृत कंत्राट पद्धती हे मुख्य कारण असल्याचे स्पष्ट होते. बड्या कंत्राटदारांना हजारो केंद्रांचे कंत्राट दिले जाते. अधिक नफा मिळवण्याच्या हव्यासापोटी हलक्या दर्जाचा माल खरेदी केला जातो. या संपूर्ण प्रक्रियेत अन्न दर्जा तपासणी करणाऱ्या सरकारी प्रयोगशाळा, स्थानिक पुरवठा अधिकारी आणि प्रशासकीय अधिकारी यांची संगनमताची साखळी कार्यरत असते. कमिशनच्या गणितामुळे तपासणी अहवाल केवळ कागदावर 'उत्कृष्ट' दाखवले जातात. जेव्हा अन्न निकृष्ट निघते, तेव्हा दोष स्वयंपाकी किंवा अंगणवाडी सेविकेवर ढकलून मुख्य कंत्राटदार आणि त्यांना संरक्षण देणारे वरिष्ठ अधिकारी नामानिराळे राहतात. जोपर्यंत निकृष्ट अन्न पुरवणाऱ्या ठेकेदारांना कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकून त्यांच्यावर आणि दोषी अधिकाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल होत नाहीत, तोपर्यंत ही साखळी तुटणार नाही.

## शाश्वत तोडगे आणि धोरणात्मक सुधारणांची गरज

केवळ एका प्रकरणात कारवाई मागे घेऊन संपूर्ण यंत्रणा सुधारणार नाही; त्यासाठी मूलभूत धोरणात्मक सुधारणांची नितांत गरज आहे. पोषण आहाराची केंद्रीकृत कंत्राट पद्धत पूर्णपणे बंद करून धान्य खरेदी व स्वयंपाकाची जबाबदारी स्थानिक महिला बचत गट आणि ग्रामपंचायतींकडे सोपवली पाहिजे. गावातील महिला स्वतःच्या मुलांच्या आहारात कधीही भेसळ होऊ देणार नाहीत. प्रत्येक अंगणवाडी आणि शाळेत पालक, स्थानिक वैद्यकीय अधिकारी आणि ग्रामस्थांची एक स्वतंत्र 'अन्न दर्जा तपासणी समिती' असावी. या समितीच्या प्रत्यक्ष तपासणी आणि मंजुरीनंतरच अन्नाचे वाटप व्हावे. पोषण आहारातील त्रुटी उघड करणाऱ्या अंगणवाडी सेविका किंवा नागरिकांना कायदेशीर संरक्षण मिळाले पाहिजे, जेणेकरून प्रशासनाकडून त्यांच्यावर सूडबुद्धीने कारवाई होणार नाही. पारदर्शक डिजिटल ट्रॅकिंगने धान्याची आवक, त्याचे गुणवत्ता प्रमाणपत्र आणि वाटपाची माहिती सार्वजनिक पोर्टलवर रियल-टाइम उपलब्ध असावी, ज्यामुळे सर्वसामान्यांनाही त्यावर नजर ठेवता येईल.

देवयानी पारधी यांनी दिलेला लढा हा व्यवस्थेला लागलेली कीड दाखवून देणारा आरसा आहे. लोकशाहीत योजना या केवळ सरकारी तिजोरी रिकामी करण्याचे साधन नसाव्यात, तर त्या शेवटच्या घटकापर्यंत प्रामाणिकपणे पोहोचल्या पाहिजेत. महाराष्ट्रातील भावी पिढी सुदृढ, सशक्त आणि निरोगी घडवायची असेल, तर निकृष्ट पोषणाच्या मुळावर घाव घालून पारदर्शक व जबाबदार व्यवस्था निर्माण करणे हीच काळाची खरी गरज आहे.

लोकशाही व्यवस्थेत अंगणवाडीतील निकृष्ट पोषण आहारासारख्या गंभीर विषयावर सरकार आणि प्रशासनाला जाब विचारणे हा केवळ नागरिकांचा आणि कर्मचाऱ्यांचा अधिकार नसून ते एक मूलभूत कर्तव्य आहे. अंगणवाडीत वाटप होणाऱ्या अन्नात अळ्या, बुरशी किंवा निकृष्ट माल आढळल्यास त्यावर बोट ठेवणे म्हणजे सरकारविरोधी कट नसून, निष्पाप बालकांचे आरोग्य वाचवण्यासाठी आणि व्यवस्थेतील भ्रष्टाचार उघडा पाडण्यासाठी उठवलेला सजग आवाज असतो. भारतीय राज्यघटनेच्या कलम १९(१)(अ) अन्वये मिळालेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य हेच अधोरेखित करते की, सरकार जनतेच्या सेवेसाठी असते आणि त्यांच्या चुकीच्या धोरणांवर किंवा लाचखोर कंत्राटदार-अधिकारी साखळीवर सनदशीर मार्गाने टीका करणे हा लोकशाहीचा आत्मा आहे. जर व्यवस्थेतील त्रुटींवर भीतीपोटी कोणी बोललेच नाही, तर बालकांचे आरोग्य कायम धोक्यात राहील आणि प्रशासकीय मनमानी अधिक फोफावेल; त्यामुळे लोकहितासाठी, सत्याच्या बाजूने आणि बालकांच्या भविष्यासाठी निर्भयपणे प्रश्न विचारणे व आवाज उठवणे हे कोणत्याही दडपशाहीपेक्षा अधिक न्याय्य आणि आवश्यक आहे.

अंगणवाडी केंद्रांमधील पोषण आहारातील त्रुटी आणि निकृष्ट दर्जाविरोधात आवाज उठवल्यामुळे अंगणवाडी सेविका देवयानी पारधी यांच्यावर प्रशासनाने तडकाफडकी बडतर्फीची कारवाई केली होती.

सोशल मीडियावरील मोहिमेच्या वाढत्या दबावामुळे अखेर जिल्हा परिषद अध्यक्षांना ही कारवाई मागे घेऊन पारधी यांना सेवेत पुनर्स्थापित करावे लागले.

हे प्रकरण केवळ एका सेविकेच्या पुनरागमनापुरते मर्यादित नसून, ते पोषण आहाराच्या नावाखाली गरीब मुलांच्या आरोग्याशी होणाऱ्या खेळामधील गंभीर त्रुटी उघड करते. निकृष्ट अन्न पुरवणारे भ्रष्ट कंत्राटदार आणि टक्केवारीच्या हव्यासापोटी दुर्लक्ष करणारे तपासणी अधिकारी या व्यवस्थेला थेट जबाबदार असून, जोपर्यंत आहार वाटपाचे काम स्थानिक महिला बचत गटांकडे सोपवले जात नाही, पालक-वैद्यकीय अधिकाऱ्यांची स्वतंत्र तपासणी समिती कार्यरत होत नाही आणि दोषींवर कठोर फौजदारी कारवाई होत नाही, तोपर्यंत बालकांच्या आरोग्याचा हा मूलभूत प्रश्न कायमस्वरूपी सुटणार नाही.

– ९५६१५९४३०६

# ऑस्ट्रेलियाचा बांगलादेशवरील विजय भारताच्या पथ्यावर, कोलंबोत भारत स्थितीत!

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत बांगलादेशचा झालेला पराभव, जागतिक कसोटी चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) च्या अंतिम फेरीच्या शर्यतीत भारतासाठी फायदेशीर ठरला आहे. मॅके येथे ऑस्ट्रेलियाने बांगलादेशला एक डाव आणि ५१ धावांनी पराभूत केले, ज्यामुळे बांगलादेशचा पीसीटी घसरला. आता, जर भारताने कोलंबो येथे श्रीलंकेविरुद्धची दुसरी कसोटी जिंकली, तर तो बांगलादेशला मागे टाकून डब्ल्यूटीसी गुणतालिकेत चौथ्या स्थानावर पोहोचू शकतो.

## डब्ल्यूटीसीमध्ये बांगलादेशला मागे टाकण्याची भारताला संधी

ऑस्ट्रेलियाच्या विजयाने डब्ल्यूटीसी गुणतालिकेत बांगलादेशला मोठा धक्का बसला आहे. पहिली कसोटी जिंकल्यानंतर बांगलादेशचा पीसीटी ६६.६७ होता, जो दुसरी कसोटी गमावल्यानंतर ५५.५६ पर्यंत घसरला. असे असूनही, बांगलादेश सध्या चौथ्या स्थानावर कायम आहे.

१० सामन्यांनंतर भारताकडे ६४ गुण आणि ५३.३३ चा पीसीटी आहे. या कालावधीत भारतीय संघाने पाच सामने जिंकले आहेत, चार गमावले आहेत आणि एक अनिर्णित राहिला आहे. त्यामुळे, श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत विजय मिळवल्यास भारताला बांगलादेशला मागे टाकून डब्ल्यूटीसी क्रमवारीत चौथ्या स्थानावर पोहोचण्यास मदत होईल. पराभव होऊनही, बांगलादेशने आयसीसी कसोटी क्रमवारीत इतिहास रचला आहे. मॅके कसोटीतील दारुण पराभवानंतरही, बांगलादेशला एक आनंदाची बातमी मिळाली आहे. ताज्या आयसीसी कसोटी संघ क्रमवारीत, बांगलादेशने तीन स्थानांची झेप घेत प्रथमच सहावे स्थान पटकावले आहे. ७८ रेटिंग गुणांसह बांगलादेश आता वेस्ट इंडिज, पाकिस्तान आणि श्रीलंका यांच्या पुढे आहे.

बांग्लादेशचा कसोटी कर्णधार नाझमुल होसेन शांतो याने याला एक मोठे यश म्हटले आहे. तो म्हणाला की सहाव्या स्थानावर पोहोचणे ही एक चांगली बातमी आणि संघासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे, जरी त्याने हे देखील मान्य केले की दुसऱ्या कसोटीत अधिक चांगली कामगिरी करता आली असती. बांग्लादेश २३ वर्षांनंतर कसोटी मालिकेसाठी ऑस्ट्रेलियात आला होता. शांतोने ऑस्ट्रेलियाविरुद्ध अधिक कसोटी सामने खेळण्याची इच्छाही व्यक्त केली. बांगलादेशने अलीकडेच २३ वर्षांनंतर ऑस्ट्रेलियात कसोटी मालिका खेळली. यापूर्वी संघ २००३ मध्ये कसोटी मालिकेसाठी ऑस्ट्रेलियात आला होता. शांतोच्या मते, जर बांगलादेशी खेळाडू ऑस्ट्रेलियासारख्या आव्हानात्मक परिस्थितीत नियमितपणे खेळले, तर त्यांना तेथील परिस्थितीशी आणि वेगवान गोलंदाजीशी जुळवून घेण्यास मदत होईल. तो म्हणाला की संघातील जवळपास ९० टक्के खेळाडूंना ऑस्ट्रेलियामध्ये खेळण्याचा कोणताही पूवार्नुभव नव्हता.

## डार्विनमध्ये ऐतिहासिक विजय, मॅकेमध्ये स्टार्कचा कहर

पहिल्या कसोटीत, बांगलादेशने मायदेशात ऑस्ट्रेलियाला पहिल्यांदाच पराभूत करून इतिहास रचला. दुसऱ्या डावात ५७ धावांचे माफक लक्ष्य गाठताना संघाने नऊ गडी राखून विजय मिळवला. पहिल्या डावात हसन महमूदने सहा बळी घेऊन ऑस्ट्रेलियाला १९८ धावांवर रोखले, तर तन्झिद हसन तमीमच्या शतकाच्या जोरावर बांगलादेशने ४२६ धावा केल्या.

दुसऱ्या कसोटीत परिस्थिती पूर्णपणे बदलली. पहिल्या डावात मिचेल स्टार्कने ६/१२ अशी कामगिरी करत बांगलादेशला ६४ धावांवर गुंडाळले. कॅमेरॉन ग्रीनच्या ६७ धावांच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने २१० धावा केल्या. दुसऱ्या डावात, स्टार्कने पुन्हा एकदा बांगलादेशच्या फलंदाजीची धुलाई करत ४/३९ अशी कामगिरी केली आणि संघाला ९५ धावांवर रोखले.

## बांगलादेशचे मानांकनात यश, डब्ल्यूटीसीमध्ये भारताची चौथ्या स्थानावर नजर

एकीकडे, ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर बांगलादेशने आयसीसी कसोटी मानांकनात ऐतिहासिक सहावे स्थान मिळवले आहे, तर दुसरीकडे, दुसऱ्या कसोटीतील पराभवामुळे डब्ल्यूटीसी गुणतालिकेतील त्यांचे स्थान कमकुवत झाले आहे. याचा थेट फायदा भारताला होऊ शकतो. श्रीलंकेविरुद्धची कोलंबो कसोटी भारतीय संघासाठी महत्त्वपूर्ण असेल, कारण विजय त्यांना डब्ल्यूटीसी अंतिम फेरीच्या शर्यतीत चौथ्या स्थानावर पोहोचवू शकतो.

## भारत -श्रीलंका कोलंबो कसोटी

रविवारी श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीच्या पहिल्या दिवशी डाव्या हाताला दुखापत झाल्याने भारताचा यष्टीरक्षक-फलंदाज रिषभ पंत दुखापतग्रस्त होऊन मैदानाबाहेर गेला. दिवसाच्या तिसऱ्या सत्रात श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज लाहिरू कुमारने पंतला एक आखूड चेंडू टाकला आणि भारतीय खेळाडूने तो खेचण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू त्याच्या बॅटऐवजी डाव्या हाताला लागला.

दुखापतीनंतर पंत वेदनेने विव्हळताना दिसला. भारतीय संघाचे फिजिओथेरपिस्ट त्याच्यावर उपचार करण्यासाठी मैदानावर आले. प्रथम पंतच्या हाताला बर्फाची पिशवी लावण्यात आली आणि नंतर पट्टी बांधण्यात आली. तथापि, तीव्र वेदनांमुळे लवकरच पट्टी काढण्यात आली. पंत १५ चेंडूंमध्ये ३ धावांवर जखमी निवृत्त होऊन परतला आणि डावाच्या ५८ व्या षटकात फिजिओथेरपिस्टसोबत मैदानाबाहेर गेला. त्यानंतर रवींद्र जडेजा फलंदाजीला आला आणि त्याने देवदत्त पडिक्कलसोबत डावाला पुढे नेले.

देवदत्त पडिक्कलचे शतक(११७) आणि कर्णधार शुभमन गिल (५०) भारताने रविवारी येथे श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीच्या पहिल्या दिवशी ३ गडी गमावून २४० धावा करत आपली स्थिती मजबूत केली. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी १२० धावांची भागीदारी करून पहिल्या सत्रात लोकेश राहुल आणि यशस्वी जयस्वाल बाद झाल्याने बसलेल्या धक्क्यातून भारताला सावरण्यास मदत केली.

पडिक्कलची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. एका धावेवर असताना श्रीलंकेचा कर्णधार धनंजय डी सिल्वाने फिरकी गोलंदाज केशरा नुवान्थाच्या गोलंदाजीवर बॅकवर्ड पॉईंटला एक सोपा झेल सोडल्याने तो दुर्दैवी ठरला. पहिल्या कसोटीत १६७ धावा करणाऱ्या डावखुरा फलंदाज पडिक्कलने मिळालेल्या या संधीचा पुरेपूर फायदा घेतला आणि लय पकडल्यानंतर श्रीलंकेच्या गोलंदाजांविरुद्ध काही आकर्षक फटके खेळले. लाहिरू कुमाराच्या गोलंदाजीवर मारलेला त्याचा शक्तिशाली पुल शॉट डावातील प्रमुख आकर्षणांपैकी एक होता. या शॉटसह त्याने ९० चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले.

गिलनेही मोठ्या आत्मविश्वासाने फलंदाजी केली. डावखुरा फिरकी गोलंदाज प्रभात जयसूर्याच्या गोलंदाजीवर मारलेला त्याचा शॉर्ट आर्म पुल शॉट पाहण्यासारखा होता. मात्र, चहापानाच्या थोड्या वेळापूर्वी त्याचे लक्ष विचलित झाले आणि तो असिथा फर्नांडोच्या गोलंदाजीवर यष्टीरक्षक निरोशन डिकवेलाकडे झेल देऊन बाद झाला. तत्पूर्वी, नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या भारताने सावध सुरुवात केली, ज्यात राहुल (१८) आणि जयस्वाल (४५) यांनी पहिल्या विकेटसाठी ३७ धावा जोडल्या.

पहिल्या दिवसाचा खेळ संपायला चार मिनिट बाकी असताना रविंद्र जडेजा ४३ धावांवर त्रिफळाचित झाला. त्यानंतर पदार्पणवीर सारांश जैन फलंदाजीला आला. खेळ संपला तेंव्हा भारताच्या ५ बाद ३०० धावा झाल्या होत्या. त्यावेळी सारांश जैन ४ व ध्रुव जुरेल ७ धावांवर नाबाद परतले. भारत दुसऱ्या दिवशी मोठी धावसंख्या उभी करून सामना जिंकण्याच्या दृष्टी ने प्रयत्न करणार हि काळ्या दगडावरची रेघ आहे.

– ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सक्षम नागरिक, शिक्षक व विद्यार्थी घडविण्याचे प्रयत्न गरजेचे : गडकरी

## 'एकलव्य एकल विद्यालय शिक्षक-पर्यवेक्षक प्रशिक्षण वर्गा'चा समारोप

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून चांगले नागरिक, सक्षम शिक्षक आणि गुणवंत विद्यार्थी कसे घडतील, यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. प्रत्येक गावाने श्रमदानातून आपले गाव अधिक चांगले करण्याचा संकल्प करावा. मानकर ट्रस्टच्या माध्यमातून आदिवासी विद्यार्थ्यांना बॅट-बॉलसह विविध क्रीडा साहित्य उपलब्ध करून देण्यात येईल. त्यातून त्यांच्या क्षमता विकासाला चालना मिळेल, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले.




कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेच्या वतीने सती अनुसया माता देवस्थान, पारडसिंगा, ता. काटोल, जि. नागपूर येथे आयोजित चार दिवसीय एकलव्य एकल विद्यालय शिक्षक-पर्यवेक्षक प्रशिक्षण वर्गाचा समारोप उत्साहात झाला. केंद्रीय मंत्री तसेच संस्थेचे प्रेरणास्रोत व मार्गदर्शक नितीन गडकरी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.
आदिवासी मुला-मुलींमध्ये विशेष नैसर्गिक क्षमता असून, त्यांना योग्य संधी मिळाल्यास ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू होऊ शकतात. शिक्षणासोबत क्रीडा, आरोग्य आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून त्यांच्या क्षमतांना योग्य दिशा देता येईल, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले.
समाजाला अंधाराकडून प्रकाशाकडे, अज्ञानाकडून ज्ञानाकडे आणि गरिबी, भूकमारी व बेरोजगारीकडून संपन्नतेकडे नेण्याचा संकल्प प्रत्येकाने केला पाहिजे. लोकप्रबोधन, लोकशिक्षण, लोकसंस्कार आणि लोकसंघर्ष या चार तत्त्वांच्या माध्यमातून समाज घडविण्याची गरज आहे. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन असून, दुर्गम भागातील प्रत्येक मुलापर्यंत शिक्षण पोहोचविणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन गडकरी यांनी केले.
कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष अतुल शिरोडकर, उपाध्यक्ष राजीव हडप व मुरलीधर चांदेकर, सचिव प्रशांत बोपर्डीकर, कोषाध्यक्ष सीए मिलिंद कानडे, उपेंद्र कोठेकर, सुधीर दिवे, अनिल जोशी, अतुल मोहरिल, किशोर रेवतकर, रेखा मावसकर यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

### आदिवासी विद्यापीठाच्या उभारणीसाठी सुरू असलेले प्रयत्न : अतुल शिरोडकर

माणकर ट्रस्टतर्फे संपूर्ण महाराष्ट्रात ४९० वसतिगृहांचे संचालन करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अतुल शिरोडकर यांनी प्रास्ताविकातून दिली. संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती देताना गेल्या वर्षी २५ लाख आदिवासी नागरिकांसाठी आरोग्यविषयक अॅप तयार करण्याची उपयोजना निश्चित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आदिवासी विद्यापीठाच्या उभारणीसाठी सुरू असलेले प्रयत्न आता आयआयटी चेन्नईच्या सहकार्याने पुढे नेण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी महावीर महात्मा पुरस्कारप्राप्त तसेच जयगंगा कोचिंग (ओ.पी.सी.) प्रा. लि., ओडिशाचे संस्थापक किरण यांची प्रमुख उपस्थिती होती. तत्पूर्वी दुपारी अनुभव कथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उत्कृष्ट शिक्षण पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यानंतर सीमा गायधने यांनी वैयक्तिक गीत सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. आदिवासी नृत्याच्या सादरीकरणाने कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. किरण यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच कार्यक्रमासाठी आमंत्रित केल्याबद्दल आभार मानले. मानकर ट्रस्ट समाजातील विविध घटकांना मोठ्या प्रमाणात मदत करत असल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारत भुजाडे यांनी केले.

# सायबर सजगता हीच डिजिटल सुरक्षिततेची गुरुकिल्ली

### मेजर हेमंत जकाते विद्यालयातील विद्यार्थ्यांना सायबर हायजीन व एथिक्स या विषयावर मार्गदर्शन





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
एडुसन फाउंडेशन आणि सायबर सेल, नागपूर पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने मेजर हेमंत जकाते विद्यानिकेतन स्कूल, म्हाळगी नगर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर हायजीन व सायबर एथिक्स या विषयावर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात शाळेतील १४८ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमात सायबर सेलचे तन्मय रायसने यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ऑनलाइन फसवणूक, मोबाईल गेमिंगच्या माध्यमातून होणारे फ्रॉड, अनोळखी अढङ फाइल्स व अॅप्स, सायबर बुलिंग तसेच सोशल मीडियाचा सुरक्षित आणि जबाबदार वापर याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच वैयक्तिक माहिती, पासवर्ड किंवा अन्य संवेदनशील तपशील अनोळखी व्यक्तींशी शेअर करू नयेत, संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये आणि अनोळखी फाइल्स अथवा अॅप्स डाउनलोड करण्यापूर्वी योग्य ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. एडुसन फाउंडेशनचे संचालक निलेश काळे यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अनावश्यक वापर टाळून त्याचा उपयोग ज्ञान, अध्ययन आणि कौशल्यविकासासाठी करावा, असे सांगितले. मोबाईल आणि इंटरनेटचा वापर करताना वेळेचे भान ठेवणे तसेच सोशल मीडियापेक्षा वाचन, अभ्यास आणि सर्जनशील उपक्रमांना प्राधान्य देणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका शीलाताई मुडे होत्या. विशेष अतिथी म्हणून देवराव एस.प्रधान उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन भावना निनावे यांनी केले. कार्यक्रमाच्या समारोपावेळी विद्यार्थ्यांनी सायबर हायजीन व सायबर एथिक्सची शपथ घेतली. तंत्रज्ञानाचा वापर सुरक्षित, जबाबदार आणि नैतिक पद्धतीने करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. बदलत्या डिजिटल युगात सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणारा हा उपक्रम उपयुक्त ठरला.

# दत्तवाडीत महिला छेडछाड, घरफोडीने दहशत

### संताजी अखिल तेली समाज संघटनेचे पोलिसांना निवेदन; कठोर कारवाईची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**
वाडी शहरातील दत्तवाडी, इंद्रायणी नगर, श्रीकृष्ण नगर व डिफेन्स परिसरात घरफोडी तसेच महिला-मुलींची छेडछाड करणाऱ्या समाजकंटकांच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर श्री संताजी अखिल तेली समाज संघटनेच्या वाडी शाखेच्यावतीने वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन मगर यांना निवेदन देण्यात आले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक जायभाये उपस्थित होते. दत्तवाडी परिसरात रात्रीच्या वेळी घरफोडी तसेच महिला व मुलींची छेडछाड होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून संघटनेकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे महिला व मुलींमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, नागरिकांमध्ये संताप वाढत आहे. परिस्थिती गंभीर झाल्याने नागरिकांना स्वतः रात्री गस्त घालण्याची वेळ आली आहे.
गेल्या महिनाभरापासून अशा घटना सुरू असूनही संबंधित आरोपी पोलिसांच्या हाती लागले नसल्याने नागरिकांमध्ये पोलिसांच्या कारवाईबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिसांनी परिसरात रात्रीची गस्त वाढवून संशयितांवर लक्ष ठेवावे आणि घरफोडी व छेडछाडीच्या घटनांतील आरोपींचा तातडीने शोध घेऊन कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी संघटनेने केली. नागरिकांच्या भावना व्यक्त करताना संघटनेने पोलिसांचा वचक निर्माण झाला पाहिजे. कायद्याच्या चौकटीत आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करून महिला व नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळवून द्यावे, अशी मागणी केली. काही नागरिकांकडून आरोपींविरोधात अत्यंत कठोर कारवाई, अगदी एन्काऊंटरचीही मागणी होत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. यावेळी प्रदेशाध्यक्ष अनिल बजाईत, जिल्हाध्यक्ष अनिल दहाघाणे, रोशन वैद्य, उमेश साहू, सचिन लिचडे, मोतीराम शहारे, संजय जीवनकर, माजी पोलीस उपनिरीक्षक दीपक अवचट, प्रशांत बुटले, डॉ. प्रभाकर थोराने, देवा क्षीरसागर, प्रशांत केवटे, अजय इखार, मनोज भुरे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त निर्भय प्रभात फेरी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिना निमित्त दरवर्षी २० ऑगस्ट रोजी समितीतर्फे निर्भय प्रभात फेरी काढून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येते. यंदा डॉ. दाभोळकर यांच्या निधनाला १३ वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूरच्या वतीने संविधान चौक ते जुने मॉरिस कॉलेज आणि पुन्हा संविधान चौक अशी निर्भय प्रभात फेरी काढली.



या प्रभात फेरीत नागपूर जिल्ह्यातील विविध शाखांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम, शिवांगीनगर, टेकऑफ सिटी, प्रेरणानगर, फुलमतीनगर तसेच इतर शाखांमधील कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. मुख्य अतिथी अशोक जांभुळकर आणि ज्ञानेश्वर रक्षक यांच्या हस्ते प्रभात फेरीमधे प्रामुख्याने उपस्थित होते. प्रभात फेरीच्या समारोपानंतर झालेल्या कार्यक्रमात ज्ञानेश्वर रक्षक, राम काळे, चित्तरंजन चौरे, प्रा. पुष्पा घोडके, रामभाऊ डोंगरे, प्रा. संध्या राजूरकर आणि इतर मान्यवरांनी डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या कायार्ला उजाळा देत विचार व्यक्त केले.
अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकवादी विचारांची चळवळ पुढे नेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी देवानंद बडगे, देवयानी भगत, शोभा पाटील, सुषमा शेवडे, मंगला गाणार, कांबळे, प्रीती तिरपुडे, शिल्पा मकेश्वर आणि इतर अनेक सदस्यांनी डॉ. दाभोळकर यांच्या कायार्ला अभिवादन करणारी गीते सादर केली. डॉ. सुनील भगत यांनी प्रभात फेरीचे तसेच कार्यक्रमाचेही संचालन केले. उमेश चिट्टे यांनी प्रभात फेरी आणि कार्यक्रमाची छायाचित्रे काढली. ज्योत्स्ना बनसोड यांनी आभार प्रदर्शन केले.
कार्यक्रमाच्या सांगतेनंतर ११ सप्टेंबर २०२६ रोजी प्रदर्शित होणाऱ्या शैलेश नरवाडे दिग्दर्शित 'जयंती २' या चित्रपटाचे प्रमोशन करण्यात आले. यावेळी जयंती २ चे विशेष कलाकार किरण काशिनाथ, अक्षय खोब्रागडे आणि इतर कलाकार उपस्थित होते. विजयकांत पाणबुडे यांनी जयंती २ या चित्रपटाबद्दल सविस्तर माहिती दिली. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर जनतेने त्याला भरभरून प्रतिसाद द्यावा, असे आवाहन उपस्थितांनी केले.
यानंतर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या खुनाच्या खटल्याला गती देऊन आरोपींना लवकरात लवकर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून केली. डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित या निर्भय प्रभात फेरीच्या माध्यमातून अंधश्रद्धेविरोधात वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकवादी विचार आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला.

# नगराध्यक्षांच्या घरातच चोरी, गुल्लक फोडून चोरट्यांनी रक्कम लांबविली

### लागोपाठच्या घरफोड्यांनी भिवापूरकर भयभीत; कायदा-सुव्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
शहरात मागील महिनाभरापासून सुरू असलेल्या चोरीच्या मालिकेने आता थेट नगराध्यक्षांच्या घरापर्यंत मजल मारली आहे. घरातील सर्व सदस्य बाहेर गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने नगराध्यक्षा सुषमा श्रीरामे यांच्या घरात प्रवेश केला. आलमारीत ठेवलेला गुल्लक फोडून त्यातील रक्कम लंपास केल्याची घटना रविवारी सायंकाळी उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.
प्राथमिक माहितीनुसार, चोरट्याने घराच्या मागील दरवाज्यातून प्रवेश केला. घटनेच्या वेळी घरात कोणीही नव्हते. नगराध्यक्षा श्रीरामे या नातेवाईकांसह गोसेखुर्द धरण पाहण्यासाठी पवनी तालुक्यात गेल्या होत्या. याच संधीचा फायदा घेत चोरट्याने घरात प्रवेश करून गुल्लकातील पैशांवर हात साफ केला. सायंकाळी त्या घरी परतल्यानंतर चोरीचा प्रकार उघडकीस आला. चोरीस गेलेल्या रकमेची नेमकी माहिती रात्री उशिरापर्यंत उपलब्ध होऊ शकली नव्हती.
भिवापूर शहरात मागील काही काळापासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. तास कॉलनी परिसरात एकदा नव्हे, तर दोनदा घरफोड्यांच्या घटना घडल्या. पहिल्या घटनेत सात, तर गत आठवड्यात तीन ठिकाणी घरफोड्या झाल्या. याच परिसरात दिवसाढवळ्या चारचाकी वाहनाची काच फोडून कारमध्ये ठेवलेली दोन लाखांहून अधिक रकमेची बॅग चोरट्यांनी लंपास केल्याची घटनाही ताजी आहे.
चोरीच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. चोरट्यांच्या धुमाकुळावर अंकुश बसावा आणि नागरिकांना दिलासा मिळावा, यासाठी नगराध्यक्षा श्रीरामे यांनी यापूर्वी नगरसेवकांना सोबत घेऊन दुचाकीवरून शहरात गस्तही घातली होती. मात्र, आता चोरट्यांनी थेट नगराध्यक्षांच्या घरालाच लक्ष्य केल्याने शहरातील सुरक्षाव्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.
एकापाठोपाठ घरफोड्या, दिवसाढवळ्या वाहनातून लाखो रुपयांची चोरी, अंगणात बांधलेल्या शेळ्या लंपास होण्याच्या घटना आणि आता नगराध्यक्षांच्या घरातील चोरीया घटनांची मालिका पोलिसांसमोर गंभीर आव्हान उभी करीत आहे. चोरट्यांचा सुगावा लागत नसल्याने नागरिकांमधील असुरक्षिततेची भावना वाढत आहे.
रात्रीच नव्हे, तर दिवसाढवळ्याही चोरीच्या घटना घडत असल्याने चोरट्यांचे मनोबल वाढल्याचे चित्र आहे. या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी गस्तीसह ठोस तपास मोहीम राबवून चोरट्यांचा छडा लावावा, अशी नागरिकांची मागणी आहे. अन्यथा पुढचा नंबर कोणाचा? या चिंतेत भिवापूरकरांना दिवस काढावे लागतील.

## थोडक्यात

### ज्येष्ठ नागरिकांशी संवादातून विद्यार्थ्यांना मिळाले जीवनज्ञान



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडली येथे विद्यार्थ्यांनी ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या जीवनातील अनुभव जाणून घेतले. ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या शिक्षणाच्या काळातील परिस्थिती, शाळेचे स्वरूप, त्या वेळची जीवनशैली, संस्कृती व सामाजिक परिस्थिती याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली.
यावेळी रामकृष्ण तिजारे, मोडका ढेंगे, अनिता धांडे व बाळकृष्ण तिजारे यांनी शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या मुलाखतीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांनी अत्यंत आदराने व आपुलकीने प्रश्न विचारत ज्येष्ठ नागरिकांचे अनुभव जाणून घेतले. त्यांच्या अनुभवातून पूर्वीची संस्कृती, परंपरा व जीवनपद्धती याबाबत विद्यार्थ्यांना मौल्यवान माहिती मिळाली. याच उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी 'स्वच्छतेचे महत्त्व' तसेच 'कोण बने स्मार्ट बॉय व गर्ल' या उपक्रमांमध्येही उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका कु. अनुराधा धुर्डे यांनी केले. यावेळी सहाय्यक शिक्षक निलेश जाधव यांनी ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान व त्यांच्या अनुभवातून शिकण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. आनंददायी शनिवारचा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व संस्कारक्षम ठरला.

### साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त वांजरा येथे भव्य रॅली



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त बमलेश्वरी नगर, वांजरा, उत्तर नागपूर येथे रविवारी भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि परिवर्तनवादी विचारांना अभिवादन करण्यासाठी या रॅलीत समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या विचारांचा जागर करण्यात आला. समाजातील वंचित, शोषित आणि कष्टकरी घटकांच्या प्रश्नांना आपल्या साहित्याच्या माध्यमातून प्रभावीपणे वाचा फोडणाऱ्या अण्णाभाऊ साठे यांच्या योगदानाबद्दल उपस्थितांनी आदर व्यक्त केला. त्यांच्या समतावादी आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला.
कार्यक्रमाला लहुजी शक्ती सेना विदर्भ सचिव राजेश डोंगरे, लहुजी शक्ती सेना नागपूर जिल्हा कोर कमिटी अध्यक्ष नितीनजी वाघमारे, लहुजी शक्ती सेना नागपूर शहर अध्यक्ष रमेश पाडन तसेच सामाजिक कार्यकर्ते अजय इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती. रॅलीच्या आयोजनासाठी अजय शनेश्वर, राज डोंगरे, अंकुश वानखेडे, रोशन काळे, रुपेश खांडाळे, विवेक काळे, पृथ्वीराज डोंगरे, दिलीप काळे, रामकृष्ण वानखेडे, मीराताई डोंगरे, नेहाताई काळे, नंदाबाई काळे, लताबाई शनेश्वर, विनोद गोरले, इंदुबाई वानखेडे, पूजाताई डोंगरे, सपनाताई डोंगरे, शारदाताई खंडाळे, प्रिया वानखेडे, अशोकराव खडसे, बबीताताई खडसे, वनिता इंगळे, निलेश वानखेडे आणि रेश्मा वानखेडे यांनी परिश्रम घेतले. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या रॅलीमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या समाजबांधवांनी अण्णाभाऊंच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला.


### पोरवाल कनिष्ठ महाविद्यालय कामठी येथे भारतीय बँकिंग व्यवस्थेवर कार्यशाळा संपन्न




**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**
सेठ केसरीमल पोरवाल कनिष्ठ महाविद्यालय,कामठी येथे अभ्यासक्रमपुरक उपक्रमांतर्गत अर्थशास्त्र विभागाच्या वतीने दि. २२ ऑगस्टला "भारतीय बँकिंग व्यवस्था" या विषयावर विद्यार्थ्यांकरिता मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. युनियन बँक ऑफ इंडिया, कामठी शाखेच्या शाखा व्यवस्थापिका नीलिमा रामटेके यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य व्ही.बी.वंजारी, पर्यवेक्षक नरेंद्र मेंढे, विभाग प्रमुख डॉ. किरण पेठे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा.पंकज वाटकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. हिना कौसर यांनी अथक परिश्रम घेतले.

### राकेश रामाजी बोबडे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



राकेश रामाजी बोबडे यांचे निधन वय ७८ वर्षे. राहणार डॉ. द्विवेदी कॉलनी, गिट्टीखदान नागपूर. यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. दि. २४ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता मानकापूर घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येईल. त्यांच्यामागे पत्नी सरसा, मुलगी स्मिता बोबडे (गावंडे), जावई विजय गावंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : सोमवार, २४ ऑगस्ट २०२६

थोडक्यात

## विशाल रक्तदान अभियानाला रामटेकमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

दि. २३ ऑगस्ट २०२६ : विश्वबंधुत्व दिवस तसेच राजयोगिनी ब्रह्माकुमारी प्रकाशमणि दादीजी यांच्या १८व्या पुण्यतिथीनिमित्त रामटेक येथे विशाल रक्तदान अभियानाचे आयोजन करण्यात आले. ब्रह्माकुमारी संस्था व समाज सेवा प्रभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सुभाष वॉर्ड, मंगलवारी, रामटेक येथील आत्मचिंतन भवन ब्रह्माकुमारी सेवा केंद्रात सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत हे रक्तदान शिबिर उत्साहात पार पडले. या रक्तदान शिबिराचे आयोजन रामटेक ब्रह्माकुमारी सेवा केंद्राच्या संचालिका ललिता दीदी यांच्या सहयोगाने करण्यात आले. मानवसेवा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देत नागरिकांनी मोठ्या उत्स्फूर्ततेने रक्तदान करून या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला. यावेळी बी. के. मंगेश भाई माळोदे, बी. के. रुपेश भाई शिवनेतवार, बी. के. छाया दीदी, बी. के. कल्याणी दीदी, बी. के. श्रद्धा बहन यांच्यासह राजू भोसकर व सौ. शुभांगी राजू भोसकर यांची प्रमुख उपस्थिती होती. जीवन ज्योती ब्लड बँक, नागपूर यांच्या टीमने रक्तसंकलनासाठी विशेष सहकार्य केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदानाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पडली.

रक्तदान हे केवळ सामाजिक कर्तव्य नसून गरजू व्यक्तीचे प्राण वाचविणारे महान मानवतावादी कार्य आहे, या भावनेतून अनेक नागरिकांनी या अभियानात सहभागी होत रक्तदान केले. रक्तदान करा, जीवन वाचवा या संदेशाला रामटेक शहरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मानवतेचा आदर्श निर्माण केला. या उपक्रमातून विश्वबंधुत्व, मानवसेवा आणि सामाजिक एकतेचा संदेश जनमानसात पोहोचला. आयोजकांनी रक्तदात्यांचे, स्वयंसेवकांचे तसेच जीवन ज्योती ब्लड बँकेच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक आभार मानले.

## पीआरटी कर्मचाऱ्यांचे व हंगामी वन मजुरांचे प्रलंबित मानधन तातडीने अदा करा, अन्यथा गोंडवाना गणतंत्र पार्टीचे आंदोलन

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

पवनी वनपरिक्षेत्र, रामटेक अंतर्गत कार्यरत पीआरटी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मानधन अद्याप अदा झालेले नाही. संबंधित कर्मचाऱ्यांनी




वन विभागाचे क्षेत्रीय कामकाज प्रामाणिकपणे पार पाडूनही त्यांच्या मेहनतीचा मोबदला वेळेत मिळत नसल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. पीआरटी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मानधन तातडीने अदा करण्यासाठी RFO, पवनी यांच्या मार्फत उपसंचालक, वन विभाग यांच्याकडे आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र, मागील पाच ते सहा महिन्यांच्या प्रलंबित मानधन तातडीने अदा करून कर्मचाऱ्यांना दिलासा न दिल्यास गोंडवाना गणतंत्र पार्टीच्या वतीने संबंधित वन विभागाच्या कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. कर्मचाऱ्यांनी केलेल्या कामाचा योग्य मोबदला वेळेत मिळणे हा त्यांच्या हक्काचा विषय आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन पीआरटी कर्मचाऱ्यांचे संपूर्ण प्रलंबित मानधन तातडीने अदा करावे आणि भविष्यात मानधन नियमितपणे मिळण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी गोंडवाना गणतंत्र पार्टीच्या वतीने करण्यात आली आहे, असे गोंडवाना गणतंत्र पार्टी रामटेक, या प्रसंगी गोंडवाना गणतंत्र पार्टी चे प्रदेश अध्यक्ष हरीश उईके, ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशनचे केंद्रीय महासचिव विजय कोकोडे, प्रविण वानखेडे, विठ्ठल ठाकरे याची उपस्थिती होती.

## इसनाटोला मार्गावरील खड्डे बुजविण्यासाठी विमर्ल कटरे यांचा पुढाकार

**२०२६-२७ साठी डांबरीकरणाचा प्रस्ताव; पावसाळ्यात जीएसबी टाकण्याचे काम लवकरच सुरू होणार**

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजु फुंडे**

तिरखेडी जिल्हा परिषद क्षेत्रातील इसनाटोला मार्गावर मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना



करावा लागत आहे. पावसाचे पाणी या खड्डयांमध्ये साचत असल्याने दुचाकीस्वार, चारचाकी वाहनचालक तसेच पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत आहे. इसनाटोला मार्गाची दुरवस्था लक्षात घेऊन गावातील नागरिकांनी रस्त्याच्या कायमस्वरूपी दुरुस्तीसाठी डांबरीकरणाचा प्रस्ताव सादर करण्याची मागणी जिल्हा परिषद सदस्या विमल ताई बबलू कटरे यांच्याकडे केली. नागरिकांच्या मागणीची तत्काळ दखल घेत विमल कटरे यांनी सन २०२६-२७ मध्ये डांबरी रस्त्याच्या कामासाठी प्रस्ताव दाखल केला आहे.

दरम्यान, कायमस्वरूपी डांबरीकरणाचे काम मंजूर होऊन सुरू होईपर्यंत पावसाळ्यात नागरिकांना त्रास होऊ नये, यासाठी रस्त्यावरील खड्डे बुजविण्याकरिता जीएसबी टाकण्याचे काम लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती विमल ताई कटरे यांनी दिली. नागरिकांच्या दैनंदिन समस्या आणि आपल्या जिल्हा परिषद क्षेत्रातील विकासकामांना प्राधान्य देत, कोणतीही समस्या नागरिकांनी थेट आपल्या निदर्शनास आणून द्यावी, ती सोडविण्यासाठी आपण तत्परतेने प्रयत्न करू, अशी भूमिका विमल ताई कटरे यांनी व्यक्त केली. इसनाटोला मार्गाच्या दुरुस्तीबाबत तातडीने पुढाकार घेतल्याने परिसरातील नागरिकांकडून विमल ताई कटरे यांच्या प्रयत्नांचे स्वागत करण्यात येत असून, रस्त्याचे डांबरीकरणाचे काम लवकरात लवकर मार्गी लागावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# आमगाव-चांदसूरज डांबरी रस्त्याची दुरवस्था, खड्डूयांमुळे नागरिक त्रस्त

**साखरीटोला पुलाचीही बिकट अवस्था, वारंवार डागडुजी करूनही समस्या कायम**

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा -राजू फुंडे**

आमगाव ते चांदसूरज तसेच सालेकसा-आमगाव मार्गाची सध्या मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाचे पाणी या खड्डूयांमध्ये साचत असल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. दुचाकीस्वार, चारचाकी वाहनचालक, विद्यार्थी तसेच पायी जाणाऱ्या नागरिकांना या खराब रस्त्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या मार्गावर यापूर्वी खड्डूयांमुळे अपघातही झाले असून, अनेक नागरिक वाहनांवरून घसरून पडल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

**लोकप्रतिनिधींनी ठोस भूमिका घेण्याची मागणी**

आमच्या भागाचे खासदार आणि आमदार या रस्त्याच्या समस्येकडे कधी गांभीर्याने लक्ष देणार? असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. रस्त्याच्या कामाबाबत विचारणा केली असता काम मंजूर झाले आहे, असे सांगितले जाते; मात्र प्रत्यक्ष काम कधी सुरू होणार, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

काम मंजूर झाले असेल तर ते प्रत्यक्षात कधी होणार? केवळ आश्वासने देऊन आणखी किती दिवस नागरिकांना प्रतीक्षा करायला लावणार? अशी नाराजी नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. संबंधित लोकप्रतिनिधींनी शासनाकडे पाठपुरावा करून या मागासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा आणि रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी होत आहे.

**साखरीटोला पुलाची अवस्थाही चिंताजनक**

सालेकसा-आमगाव मार्गावरील साखरीटोला येथील पुलाची अवस्थाही काही वर्षांपासून खराब असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. पुलाची दुरवस्था झाल्यामुळे बस आणि मोठ्या



ट्रकच्या वाहतुकीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे बसला पर्यायी मार्गाने जावे लागत असून, प्रवाशांचा वेळ आणि खर्च दोन्ही वाढत आहेत.

दरम्यान, बससेवा व मोठ्या वाहनांच्या वाहतुकीवर मर्यादा आल्याने सवारी वाहने, काळी-पिवळी वाहने आणि टेम्पो यांच्यावर प्रवाशांची मोठी भिस्त आहे. त्यामुळे या वाहनांच्या भाड्यातही वाढ झाल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. परिणामी आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या सर्वसामान्य आणि गरीब प्रवाशांना अतिरिक्त आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

**क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहून नेण्याचा आरोप**

लहान सवारी वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसविले जात असल्याच्या तक्रारीही नागरिकांकडून करण्यात येत आहेत. काही वाहनांमध्ये १२ ते १५ प्रवासी बसविले जात असल्याचे सांगण्यात येते. संबंधित वाहनांची अधिकृत प्रवासी क्षमता किती आहे, याची तपासणी करून क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक होत असल्यास कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

या प्रकाराकडे सालेकसा पोलीस ठाणे व संबंधित वाहतूक यंत्रणेने गांभीर्याने लक्ष देऊन नियमित तपासणी करावी, अशी मागणीही पुढे आली आहे.

**वारंवार डागडुजी नको, कायमस्वरूपी उपाय हवा**

रस्त्यावर खड्डे पडले की त्यात डांबर अथवा खडी टाकून तात्पुरती डागडुजी केली जाते. मात्र काही दिवसांतच ती डागडुजी खराब होऊन पुन्हा परिस्थिती जैसे थे होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे वारंवार तात्पुरती डागडुजी करण्याऐवजी रस्त्याचे कायमस्वरूपी आणि दर्जेदार बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी आहे.

## बहुपक्षीय लोकशाहीला वाळवी लावण्याचा प्रयत्न, आपला राष्ट्रग्रंथ संविधान जगात सर्वोत्तम : ज्येष्ठ संपादक तुळशीदास भोईटे

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई-रवींद्र मालुसरे**

संसदीय लोकशाही बहुपक्षीय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान घडवताना भारतातील विविधता लक्षात घेत बहुपक्षीय संसदीय लोकशाही आपल्याला दिली. पण गेल्या काही दशकांमध्ये राजकीय स्वाथार्साठी पक्षांतरे आणि आता तर थेट पक्षचोरीचा आरोप होत, पक्षांचंच अस्तित्व संपवण्यास सुरुवात केली आहे. बहुपक्षीय संसदीय लोकशाहीला अशी वाळवी लागत पक्षच संपू लागले, तर लोकशाहीच उरेल कशी? मुद्दा फक्त ठाकरे, शिंदे, पवार, फडणवीस, मोदी, शाह, गांधी या राजकीय नेत्यांपुरता मर्यादित नाही. मुद्दा फक्त शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस, भाजपा या पक्षांपुरता सुद्धा मर्यादित नाही. त्याची व्यापकता समजणं, गरजेचं आहे. हा संसदीय लोकशाहीच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे असे मत राजकीय विश्लेषक मुक्तपीठचे संपादक तुळशीदास भोईटे यांनी वृत्तपत्र लेखकांच्या समोर मांडले.

काशिनाथ धुरू हॉल ट्रस्टच्या दादर सार्वजनिक वाचनालयात मराठी वृत्तपत्र लेखक संघाचा ७७ वा वर्धापन दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्यावेळी भोईटे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी माजी प्रमुख कार्यवाह विश्वनाथ पंडीत तर पोलादपूर तालुक्यातील विद्यादानाचे कार्य निस्वार्थीपणे करणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शिवराम उतेकर, माजी अध्यक्ष विजय ना कदम, माजी अध्यक्ष प्रकाश नागाने हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. लोकशाहीचा गाभा संविधानात वसलेला असतो आणि त्या लोकशाहीला जिवंत ठेवण्याचे काम लेखणी करीत असते. शब्दांमध्ये समाजाला दिशा देण्याची, व्यवस्थेला प्रश्न विचारण्याची आणि सत्याचा आरसा दाखवण्याची ताकद असते. याच विचारधारेला केंद्रस्थानी ठेवून मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या वतीने 'वृत्तपत्र लेखक दिनाचे औचित्य साधून या विशेष वैचारिक व्याख्यानाचे आयोजन केले होते.

भोईटे पुढे असेही म्हणाले की, हातातील दोन विषय बाजूला ठेवून देशवासीयांसमोर आलेली सध्याची राजकीय परिस्थिती सर्वांनाच अस्वस्थ करून सोडत आहे, त्यामुळे पुस्तक लिहिण्यासाठी मी तिसरा विषय हाती घेतला तो संविधानाचा. आपल्या राष्ट्रग्रंथाचे महत्व अधोरेखित करण्याचा. आपल्या राष्ट्रग्रंथासोबत सभोताली आजवर घडत आलेल्या, घडत असलेल्या, घडू शकणाऱ्या राजकारणाचा वेधही घेण्याचा अभ्यासपूर्ण प्रयत्न केला आहे. सभोवतालचं वास्तव प्रत्येकाला कळलं पाहिजे. राष्ट्रग्रंथ संविधानात नेमकं काय आहे, तोच जगातील सर्वोत्तम कसा तेही सोप्या शब्दात समजलंच पाहिजे. त्यातून त्याच्या कसोटीवर सारं काही पाहण्याची सवय लागलीच पाहिजे.

शिवराम उतेकर यांनी परिस्थिती कशीही असो माणसाने आपल्या आयुष्याचे ध्येय ठरवले पाहिजे, त्याचबरोबर आपण समाजाचे काही देणं लागतो या भावनेतून विशेषतः परिस्थतीशी झगडणाऱ्या लोकांसोबत आपण माणुसकीच्या भावनेतून उभे राहायला हवे. वृत्तपत्र लेखक हेच काम हातात लेखणी धरून निर्भिडपणे आणि निस्वार्थीपणे करीत असतो. वर्तमानातील सामाजिक व राजकीय घडामोडींचे भान ठेवत, संविधानाच्या मूळ मूल्यांशी निष्ठा राखून समाजहितैषी लेखन कसे घडायला हवे यावर आज सखोल विचारमंथन झाले आहे.

संघाध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी १९४९ पासूनच्या संस्थेच्या चळवळीचा आढावा घेतला. वृत्तपत्र लेखक हा ऐकतो, बोलतो, वाचतो आणि मग लिहितो, याच अनुषंगाने आज दिल्ली दरबारी डाव प्रतिडाव चाललेल्या व देशभर घुसळण चाललेल्या महत्त्वाच्या विषयावर आपण चर्चा करणार आहोत. आदर्श वार्ताहर संपादक पंकजकुमार पाटील यांचा प्रभाकर पाध्ये स्मृती पुरस्कार प्रदान करून यावेळी गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम प्रमुख दिगंबर चव्हाण तर आभार प्रदर्शन कार्यवाह नितीन कदम यांनी केले. कार्यक्रम प्रमुख सुनील कुवरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्याध्यक्ष रमेश सांगळे, माजी अध्यक्ष प्रकाश नागणे, दत्ताराम गवस, राजन देसाई, रामचंद्र जयस्वाल, अब्बास आतार, श्रीनिवास डोंगरे, विवेक तवटे, सतीश भोसले, दिलीप दळवी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

## श्रावणात 'बम बम भोले'च्या जयघोषाने कावड यात्रा भक्तिमय



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजु फुंडे**

श्रावण महिन्याच्या पावन पर्वानिमित्त केसर कॉलनी, आमगाव खुर्द येथील श्री लक्षेश्वर महादेव मंदिराच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले. या कावड यात्रेत महिला, पुरुष तसेच शिवभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होत भक्तिभावाने यात्रेचा लाभ घेतला. कावड यात्रेला श्री लक्षेश्वर महादेव मंदिरापासून सुरुवात झाली.

ही यात्रा बस स्टॉप, सुभाष चौक, गांधी चौक, कुंभार मोहल्ला, हनुमान मंदिर मार्गे रोंढा नदीच्या पात्रापर्यंत पोहोचली. नदीचे पवित्र जल कावडीत घेऊन भाविक पुन्हा श्री लक्षेश्वर महादेव मंदिराकडे रवाना झाले. यावेळी संपूर्ण मार्गावर बम बम भोले, हर हर महादेवच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. भगव्या पताका, कावडी आणि शिवनामाच्या जयघोषामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. महिला व पुरुष भाविकांनी मोठ्या उत्साहाने कावड यात्रा पूर्ण करून भगवान श्री लक्षेश्वर महादेवाचे जलाभिषेक व पूजन केले.

श्रावण महिन्यात भगवान शिवाची आराधना करण्याला विशेष महत्त्व असून, या कावड यात्रेमुळे परिसरातील भाविकांमध्ये धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. श्रद्धा, भक्ती आणि एकतेचा संदेश देणारी ही कावड यात्रा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाली.

# कृषी अधिकारी व शास्त्रज्ञ शेतकऱ्यांच्या बांधावर; संत्रा-मोसंबी फळगळ नियंत्रणासाठी प्रत्यक्ष मार्गदर्शन

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यात संत्रा व मोसंबी पिकांमध्ये काही ठिकाणी होत असलेल्या फळगळीच्या समस्येने शेतकऱ्यांची चिंता वाढली असताना कृषी विभागाने पुढाकार घेत अधिकारी व शास्त्रज्ञांना थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पाठविले. तालुक्यातील विविध फळबागांची प्रत्यक्ष पाहणी करून फळगळ, अन्नद्रव्यांची कमतरता, कीड-रोगांचा प्रादुर्भाव तसेच बदलत्या हवामानाचा परिणाम याबाबत उत्पादक शेतकऱ्यांना शास्त्रीय मार्गदर्शन करण्यात आले.

संत्रा व मोसंबी पिकांतील फळगळीसंदर्भात शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी व अर्जांच्या अनुषंगाने कृषी विभागाने विशेष पाहणी मोहीम राबविली. यावेळी खेडी, कर्यात व गोधनी गायमुख परिसरातील संत्रा व मोसंबी बागांना भेट देऊन झाडांची वाढ, फळधारणा, पानांची स्थिती, नवीन फुटवे, अन्नद्रव्यांची उपलब्धता तसेच



कीड व रोगांची लक्षणे यांची बारकाईने पाहणी करण्यात आली.

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वंडली फार्मच्या शास्त्रज्ञ ए. डी. बागडे यांनी फळगळ होण्यामागील विविध कारणांची सविस्तर माहिती शेतकऱ्यांना दिली. फळबागांमध्ये संतुलित खत व्यवस्थापन, सूक्ष्म अन्नद्रव्यांचा योग्य वापर, योग्य पाणी व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण तसेच बहार व्यवस्थापन या बाबींकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. केवळ फळगळ सुरू झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा फळबागेच्या प्रत्येक वाढीच्या अवस्थेत शास्त्रीय पद्धतीने नियोजनबद्ध व्यवस्थापन करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. बागेतील झाडांवर अनावश्यक औषधांची फवारणी टाळून कृषी विभाग व तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसारच आवश्यक उपाययोजना करण्याचे आवाहन करण्यात आले.

बदलत्या हवामानामुळे तापमानातील चढ-उतार, अनियमित पाऊस आणि आर्द्रतेतील बदल यांचा संत्रा व मोसंबी बागांवर परिणाम होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या बागेचे नियमित निरीक्षण करून झाडांची अवस्था, फळधारणा, पानांचा रंग, नवीन वाढ तसेच कीड व रोगांची लक्षणे याकडे विशेष लक्ष द्यावे, असे मार्गदर्शन करण्यात आले.

उप कृषी अधिकारी पी. आर. कोकाटे यांनी संत्रा व मोसंबी पिकांच्या मुख्य वाढीच्या काळातील अन्नद्रव्य व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. झाडांच्या वयानुसार व वाढीच्या अवस्थेनुसार आवश्यक अन्नद्रव्यांचा योग्य प्रमाणात आणि योग्य वेळी वापर करण्याचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. माती परीक्षण व तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार खतांचा वापर करून अनावश्यक खर्च टाळावा, असेही त्यांनी सांगितले.

या पाहणीदरम्यान शेतकऱ्यांनी आपल्या फळबागांमधील विविध समस्या कृषी अधिकारी व शास्त्रज्ञांसमोर मांडल्या. प्रत्येक बागेची परिस्थिती लक्षात घेऊन प्रत्यक्ष बांधावरच आवश्यक उपाययोजनांचे मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे शेतकऱ्यांना फळगळ नियंत्रणासह अन्नद्रव्य व्यवस्थापन, कीड-रोग नियंत्रण आणि फळबागांच्या एकात्मिक व्यवस्थापनाची महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. कृषी विभागाच्या या शेतकऱ्यांच्या बांधावर उपक्रमामुळे संत्रा व मोसंबी उत्पादकांना वेळेवर तांत्रिक मार्गदर्शन मिळाले असून, शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन केल्यास फळगळ कमी करून फळबागांचे नुकसान टाळण्यास मदत होणार आहे. यावेळी तालुका कृषी अधिकारी के. डी. कोळी, मंडळ कृषी अधिकारी आर. आर. चंडीमेश्राम, उप कृषी अधिकारी पी. आर. कोकाटे, कृषीसेवक कु. एम. आर. खरवडे तसेच कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कृषी विभागाच्या अधिकारी व शास्त्रज्ञांच्या प्रत्यक्ष बांधावर भेटीमुळे नरखेड तालुक्यातील संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना फळगळ नियंत्रण, संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण आणि बदलत्या हवामानात फळबागांची योग्य निगा राखण्याबाबत उपयुक्त शास्त्रीय मार्गदर्शन मिळाले आहे. शेतकऱ्यांनी फळबागांमध्ये कोणतीही समस्या दिसून येताच विलंब न करता कृषी विभागाशी संपर्क साधून वेळेवर तांत्रिक मार्गदर्शन घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

थोडक्यात

## तरुण मराठी साहित्यिकांपर्यंत पोहोचण्यासाठी अधिक तंत्रस्नेही कार्यपद्धती अवलंबणार : योगेश सोमण

### अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांचा नागपुरात सत्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नवोदित आणि तरुण मराठी साहित्यिकांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचण्यासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या कार्यपद्धतीत तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्यात येईल, असे महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी सांगितले. शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे अधिकाधिक तरुण साहित्यिकांना जोडणारे व्यासपीठ ठरावे, यासाठी विशेष प्रयत्न करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. साहित्य, नाट्य आणि चित्रपट क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांच्या हस्ते आज योगेश सोमण यांचा नागपुरात सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष नरेश गडेकर, नागपूर शाखेचे अध्यक्ष अजय पाटील आणि कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर उपस्थित होते. शाल, पुष्पहार आणि सन्मानचिन्ह देऊन सोमण यांचा सत्कार करण्यात आला.

शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अधिक व्यापक करण्यासाठी संमेलनापूर्वी ९९ नांदी संमेलने आयोजित करण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला. या एकदिवसीय नांदी संमेलनांमध्ये त्या-त्या भागातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या २५ व्यक्तींना निमंत्रित करून, त्यांना कुटुंबासह मुख्य साहित्य संमेलनासाठी आमंत्रित करण्याचा विचार असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्य साहित्य संमेलनात अभिवाचन कट्टा, कवी कट्टा यांसारख्या उपक्रमांसाठी मुख्य व्यासपीठासोबतच छोटी-छोटी व्यासपीठे उभारून अधिकाधिक तरुणांना सहभागी करून घेण्यात येणार असल्याचे सोमण यांनी सांगितले. तरुणाईच्या विचारांना आणि नवसंकल्पनांना व्यासपीठ मिळणे गरजेचे आहे. तरुणांनी अधिकाधिक लिहिते व्हावे आणि अभिजात मराठी भाषेची पालखी पुढील पिढीने तितक्याच ताकदीने पुढे न्यावी, यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनीही तरुणाईला साहित्य क्षेत्राशी जोडण्यासाठी अनेक उत्तम कल्पना मांडल्या आहेत. महामंडळाशी संबंधित साहित्यिकांना साहित्य संमेलनाच्या ठिकाणी येणे अधिक सुलभ व्हावे, यासाठीही प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सोमण यांनी सांगितले. तरुणांच्या कल्पक विचारांना आणि नव्या संकल्पनांना योग्य व्यासपीठ मिळाल्यास मराठी साहित्य अधिक समृद्ध होईल आणि मराठी भाषेचा मान सर्वत्र वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सत्कारानंतर नरेश गडेकर यांनी योगेश सोमण यांच्या कायार्चा उल्लेख करत, नाट्य, अभिनय, क्रीडा आणि साहित्य अशा विविध क्षेत्रांवर त्यांची चतुरस्त्र पकड असल्याचे सांगितले. अध्यक्षपदाच्या कार्यकाळात त्यांनी मांडलेल्या संकल्पनांच्या पूर्ततेसाठी कायम त्यांच्या पाठीशी राहू, असे आश्वासन त्यांनी दिले.

अध्यक्षीय समारोपात विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांनी कथनी आणि करणीमध्ये भेद न करणारे कलाकार, वक्ते आणि अभिनेते म्हणून योगेश सोमण यांचे कौतुक केले. अध्यक्षपदाची जबाबदारी ते अत्यंत कणखरपणे सांभाळतील, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन शुभदा फडणवीस यांनी केले.

## राजयोगिनी दादी प्रकाशमणी जी यांच्या १९ व्या पुण्यतिथीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

राजयोगिनी दादी प्रकाशमणी जी यांच्या १९ व्या पुण्यतिथीनिमित्त जागतिक बंधुत्व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये ५५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. प्रजापिता ब्रह्मकुमारी सावनेर येथील सभागृहात आयोजित या कार्यक्रमाचा शुभारंभ दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी सावनेर केंद्राच्या संचालिका सुरेखा दीदी, भारतीय जनता पक्षाचे नागपूर जिल्हा उपाध्यक्ष रामराव मोवाडे, इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) सावनेर शाखेच्या अध्यक्षा डॉ. स्मिता भुडे, डॉ. शिवम पुण्यनी, सावनेर तालुका मराठी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष किशोर धुंडेले, समाजसेवी सतीष भुडे, हेडगेवार रक्तपेढीचे डॉक्टर इत्यादी प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश समाजात माणुसकीची भावना नीर्माण करुण जगात बंधुभावाची भावना आणि रक्तदानाचे महत्त्व जागृत करणे हा आहे. "रक्तदान म्हणजे जीवनदान" या भावनेने, जास्तीत जास्त नागरिकांना या सेवेत सहभागी होण्यासाठी आणि त्यांची सामाजिक जबाबदारी पार पाडण्यासाठी प्रोत्साहित करण्यावर भर देण्यात आला.

ब्रह्मकुमारी सावनेर सेवा केंद्राच्या संचालिका, ब्रह्मकुमारी सुरेखा दीदी यांनी सर्व तरुण बंधू-भगिनींना, तसेच समाजातील नागरिकांना, या रक्तदान शिबिरात स्वेच्छेने सहभागी होऊन रक्तदान करण्याचे आवाहन केले. या मानवतावादी उपक्रमात सहभागी होऊन, तुमचे रक्त एखाद्या गरजू व्यक्तीचा जीव वाचवू शकते. त्यामुळे, सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करून मानवतेच्या सेवेत योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

राजयोगिनी दीदी प्रकाशमणी यांच्या १९ व्या पुण्यतिथीनिमित्त, भव्य ब्रह्मभोजासोबत एका भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, ज्याचा शेकडो लोकांनी लाभ घेतला. आयोजनाचे संचालन ब्रम्हकुमारी सुनीता दिदीने तर आभार ब्रम्हकुमारी प्रियंका दिदीने मानले. आयोजनाच्या यशस्वीतेकरिति ब्रम्हकुमारी शिमला सिंग, भाई विनोद मोरे, भाई अनिल ढवळे सह प्रजापिता ब्रम्हाकुमारी केन्द्र सावनेरचे सर्वांनी परिश्रम घेतले.

# ३५०० वादकांनी केला ढोल-ताशा निनाद





दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : विदर्भातील ५५ ढोल-ताशा पथकातील युवकांनी 'मंथन ४ युवा नागपूर २०२६' अभियानाच्या समारोपाप्रसंगी रेशीमबाग मैदानावर वादनाने एका वेगळ्या रेकॉर्डची नोंद आपल्या नावाने करून घेतली. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा समारोप कार्यक्रम पार पडला. तत्पुर्वी मुख्यमंत्र्यांनी युवकांशी संवाद साधला. या आयोजनात मोठ्या प्रमाणात नागपुरकरांची उपस्थिती होती. देशातील युवकांना एकसंघ करण्यासाठी देशभरात सुरू असलेल्या मोहिमेचा राज्यातील हा महत्वाचा टप्पा असल्याचेही सांगितले जात आहे.

## पार्थिव शिवलिंग निर्मिती सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

### मानकापूर येथील उपक्रमात हजारोंचा सहभाग

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मानकापूर येथील लोटस कल्चरल अँड स्पोर्टिंग असोसिएशनतर्फे शिवमंदिर परिसरात आयोजित पार्थिव शिवलिंग निर्मिती सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज भेट दिली. मुख्यमंत्र्यांनीही या उपक्रमात सहभागी होऊन शिवलिंगांची निर्मिती केली.

मंत्रोच्चाराच्या जयघोषात मुख्यमंत्र्यांनी प्रथम शिवलिंगाचे दर्शन घेतले. या सोहळ्याचे संयोजक श्री दयाशंकर तिवारी, अनिल बावनगडे, अमोल कोल्हे, आशिष पाली, नवीन जैन, प्रभाकर ठाकरे व समितीचे सदस्य उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी तीन शिवलिंगांची निर्मिती केली. भारतीय संस्कृतीतील शिवआराधनेचे महत्त्व अधोरेखित करत मुख्यमंत्री म्हणाले, श्रावण महिन्यात आयोजित या सोहळ्यामुळे परिसरातील वातावरण पवित्र झाले असून येथे महिला पुरुषांसह दिव्यांगजन आणि बालकेदेखील पार्थिव शिवलिंगाची निर्मिती करीत असल्याचे दृश्य प्रसन्नता निर्माण करणारे आहे. भारतीय संस्कृतीत शिवआराधना महत्त्वाची मानली जाते. आदी-अनंताचे प्रतीक म्हणजे शिव. या शिवपूजेतून आत्मिक शांतता व मानसिक स्थैर्य प्राप्त होत आहे. यावर्षीच्या उपक्रमात ९१ लक्ष पार्थिव शिवलिंग निर्मिती



करण्यात येणार असून महिनाभर चालणाऱ्या या सोहळ्यात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

**दि १३ ऑगस्ट ते १२ सप्टेंबरदरम्यान**

आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याचे हे तिसरे वर्ष असून यंदा ९१ लाख पार्थिव शिवलिंग निर्मितीचा संकल्प सोडण्यात आला आहे. शिवलिंगांसाठी गंगा तीरावरून माती येथे आणण्यात आली असून दररोज सूर्यास्तानंतर ह्या पार्थिव शिवलिंगांचे विसर्जन करण्यात येते. दि १२ सप्टेंबर रोजी यज्ञ व महाप्रसादाने ह्या सोहळ्याची सांगता होणार असल्याचे दयाशंकर तिवारी यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी उपस्थित भाविकांना शुभेच्छा दिल्या.

## सिरसी ग्रामपंचायतीमध्ये ६० लाखांचा निधी निधीचा अपहार; मुलभूत सुविधांचा बोजवारा?

### सरपंच व भाजप सदस्यांच्या संगनमताने कमिशनसाठी प्रशासकीय निधीची अवैध वसुलीचा आरोप

**दै. सिंहवाणी वृत्त, सिरसी**

स्थानिक ग्रामपंचायतीच्या कारभारात मोठा भ्रष्टाचार आणि अनागोंदी समोर आली असून, गावाच्या मुलभूत विकासासाठी प्राप्त झालेला सुमारे ६० लाख रुपयांचा निधी प्रत्यक्ष नागरी सुविधांवर खर्च न करता सरपंच व भाजप सदस्यांनी स्वहितासाठी आणि कमिशनसाठी नियमबाह्य खरेदीत उडवल्याचा गंभीर आरोप गावकऱ्यांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गावातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि आरोग्य यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या मुलभूत सुविधा सुधारण्यासाठी शासनाकडून निधी मंजूर झाला होता. मात्र, प्रत्यक्ष गावात कोणतेही विकासात्मक काम न करता केवळ स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी आणि कमिशन लाटण्यासाठी विविध साहित्याची बेकायदेशीर खरेदी दर्शवून या निधीचा अपहार करण्यात आल्याचे समोर येत आहे.

**शासनाची अन् नागरिकांची फसवणूक**

गावात एकीकडे पिण्याच्या पाण्याची टंचाई, रस्त्यांची दुरवस्था आणि स्वच्छतेचा अभाव यामुळे नागरिक हैराण असताना, दुसरीकडे लोकप्रतिनिधींनी ६० लाख रुपयांच्या निधीचा स्वतःच्या स्वाथार्साठी वापर केल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. शासकीय नियमांना पायदळी तुडवून ही अवैध वसुली आणि खरेदी प्रक्रिया पार पाडण्यात आली असून यामागे मोठी आर्थिक साखळी असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

**ग्रामस्थांची मागणी:**

"गावाच्या हक्काचा निधी लाटणाऱ्या सरपंच, संबंधित भाजप सदस्य आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करण्यात यावी. ६० लाखांच्या निधीचा लेखाजोखा (ऑडिट) जाहीर करून दोषींवर त्वरित गुन्हे दाखल करण्यात यावेत, अन्यथा ग्रामपंचायतीसमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल."

## राष्ट्रीय नुत्य स्पर्धेत मिळवले प्राविण्य

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर :** नृत्यरंगम सेंटर ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स, सावनेरच्या विद्यार्थिनींचे राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत घवघवीत यश सावनेर येथील नृत्यरंगम सेंटर ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स, सावनेरच्या




विद्यार्थिनींनी "नृत्यध्वनी २०२६" राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत उत्कृष्ट यश संपादन करून संस्थेचे व सावनेर शहराचे नाव उज्ज्वल केले आहे. स्पर्धेतील भरतनाट्यम नृत्यप्रकारात परिनीता ठाकरे व शामीली जांगडे यांनी प्रथम पुरस्कार, तर समृद्धी नागवे व गार्गी पिसे यांनी तृतीय पुरस्कार पटकावला. या यशाबद्दल चारही विद्यार्थिनींचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. विद्यार्थिनींना संस्थेचे प्रशिक्षक ऋषिकेश पोहणकर यांचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल चारही विद्यार्थिनी, त्यांचे पालक तसेच नृत्यरंगम सेंटर ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स, सावनेरच्या प्रशिक्षकांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## शिक्षकाला शिकवू द्या; शैक्षणिक गुणवत्ता आपोआप वाढेल!

### अशैक्षणिक कामांच्या वाढत्या भारामुळे शिक्षक त्रस्त; शिक्षणव्यवस्थेत मनुष्यबळ व मूलभूत सुविधांची गरज

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजु फुंडे**

विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याची जबाबदारी शिक्षकांवर सोपविताना त्यांच्यावर विविध अशैक्षणिक कामांचा वाढता भार टाकला जात असल्याने शिक्षणव्यवस्थेतील विसंगती अधोरेखित होत आहे. अभ्यासक्रम पूर्ण करणे, विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देणे आणि गुणवत्तावाढीसाठी नियोजन करणे यासोबतच ऑनलाइन माहिती भरणे, विविध अहवाल व सर्वेक्षणे, प्रशासकीय कामे तसेच विविध अभियानांची जबाबदारी शिक्षकांवर येत आहे.

**शिक्षकाने शिकवायचे की सर्व कामे करायची?**

शिक्षकांकडून १०० टक्के शैक्षणिक गुणवत्ता अपेक्षित असताना त्यांचा बराच वेळ अशैक्षणिक कामांमध्ये खर्च होत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. शाळेतील अध्यापनासोबतच स्वच्छता, शालेय पोषण आहार, ऑनलाइन माहिती, विविध सर्वेक्षणे आणि प्रशासकीय जबाबदाऱ्या शिक्षकांना पार पाडाव्या लागतात. परिणामी विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापनासाठी उपलब्ध होणारा वेळ कमी होतो.

RTE Act, 2009 च्या कलम २७ नुसार शिक्षकांना अशैक्षणिक कामांसाठी नियुक्त करण्यावर मर्यादा असून जनगणना, आपत्ती निवारण आणि स्थानिक स्वराज्य संस्था तसेच विधानसभा व लोकसभा निवडणुकीशी संबंधित कामांना अपवाद करण्यात आला आहे. तसेच कलम २५ नुसार शाळांमध्ये विद्यार्थी-शिक्षक प्रमाण राखण्याची जबाबदारी शासन व स्थानिक प्राधिकरणांची आहे.

**प्राथमिक शाळांना शिपाई, कारकून कधी मिळणार?**

अनेक प्राथमिक शाळांमध्ये शिपाई किंवा पुरेसे शिक्षकेतर कर्मचारी उपलब्ध नसल्याने शाळेची स्वच्छता, परिसराची देखभाल, पाणी व इतर दैनंदिन व्यवस्थापनाची कामे शिक्षकांवर येतात. त्याचप्रमाणे कारकून नसलेल्या शाळांमध्ये कार्यालयीन कामकाज, नोंदी, पत्रव्यवहार आणि विविध माहिती संकलनाची जबाबदारीही शिक्षकांनाच पार पाडावी लागते. शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवणार की शाळेची प्रशासकीय व्यवस्था सांभाळणार?, असा सवाल उपस्थित होत आहे.

**पोषण आहार कर्मचाऱ्यांच्या मानधनाचा प्रश्न**

शालेय पोषण आहार व्यवस्थेत स्वयंपाकी तथा मदतनीसांची भूमिका महत्त्वाची आहे. मात्र, त्यांच्या मानधनाचा प्रश्नही गांभीर्याने विचारात घेण्याची गरज आहे. मेहनत, स्वच्छता आणि जबाबदारीची अपेक्षा ठेवताना संबंधित कर्मचाऱ्यांना सन्मानजनक मोबदला मिळणे आवश्यक असल्याची भावना व्यक्त होत आहे.

**भौतिक सुविधांकडेही लक्ष देण्याची गरज**

शाळेची इमारत, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, वीज, वर्गखोल्या, फर्निचर आणि डिजिटल साधने या मूलभूत सुविधांचा दजार्ही शैक्षणिक गुणवत्तेशी जोडलेला आहे. केवळ निधी मंजूर करून प्रश्न सुटत नाही. कामाची गुणवत्ता, खर्च, निविदा प्रक्रिया, प्रत्यक्ष तपासणी आणि कामाच्या पूर्णत्वाची माहिती यामध्ये पारदर्शकता असणे आवश्यक आहे.

**गुणवत्तेसाठी शिक्षकांना अध्यापनासाठी वेळ द्या**

शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी केवळ शिक्षकांना आदेश देणे पुरेसे नाही. त्यासाठी पुरेसे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मूलभूत सुविधा, सक्षम पोषण आहार व्यवस्था आणि अनावश्यक अशैक्षणिक कामातून शिक्षकांची मुक्तता आवश्यक आहे. शिक्षकाला दोष देण्यापूर्वी शिक्षणव्यवस्थेतील कमतरता तपासा, अशी मागणी आता पुढे येत आहे.

शिक्षक हा शिपाई, कारकून किंवा डेटा एंट्री ऑपरेटर नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याचा शिल्पकार आहे. त्यामुळे त्याच्या हातात खडू-पेन आणि विद्यार्थ्यांसाठी पुरेसा वेळ देणे गरजेचे आहे.

अखेरचा सवाल

शिक्षक काम करतो का? हा प्रश्न विचारण्यापेक्षा शिक्षकाला त्याचे मूळ काम शिकवणे करण्यासाठी पुरेसा वेळ दिला जातो का?, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.

**शिक्षकाला शिकवू द्या, शिक्षणाची गुणवत्ता वाढू द्या!**

शिक्षक सक्षम झाला, तर शिक्षणव्यवस्था सक्षम होईल आणि विद्यार्थ्यांचे भविष्य अधिक उज्ज्वल होईल.